साद दैवाची
साथ विजयाची

सुभाष यशवंत साठे

साद दैवाची
साथ विजयाची

सुभाष यशवंत साठे

संकल्पना व प्रकाशन: सौ. विजया सुभाष साठे
ए १०४, वेलेन्टाइन अपार्टमेंट क्रमांक १ को-ऑप. सोसायटी, अरुण कुमार वैद्य मार्ग, पिंपरी पाडा, मालाड (पूर्व), मुंबई - ४०० ०९७

भ्रमणध्वनी: ९७७३१७७३१५

ई-मेल: sathe.vijaya.s@gmail.com

अक्षरजुळणी: श्री. सुभाष साठे

मुखपृष्ठ आणि मुद्रण: श्री. अमेय साने

प्रथम आवृत्ती प्रकाशन दिनांक: १८ डिसेंबर, २०२१ (श्रीदत्त जयंती)

"साद दैवाची - साथ विजयाची" हे पुस्तक केवळ खाजगी वितरणाकरिता असून या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुनः प्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी या पुस्तकाचे लेखक आणि प्रकाशिका दोघांचीही लेखी पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे.

अर्पण पत्रिका

हे पुस्तक यांच्या पवित्र स्मृतीस आदरपूर्वक अर्पण करीत आहे.

माझी आई	माझी ताई	माझा लहान भाऊ
कै. श्रीमती नलिनी यशवंत साठे	कै.सौ. प्रतिभा प्रमोद भिडे	कै. श्री. सुनील यशवंत साठे

माझी पत्नी **सौ. विजया सुभाष साठे** हिने खंबीर राहून "मूत्रपिंड दान" करण्याचा निर्णय घेऊन मला नवं जीवन मिळवून दिले. यासाठी मी कृतज्ञता व्यक्त करतो.

अनुक्रमणिका

प्रकाशिकेचे मनोगत	१
सुभाष्य – मनोगत	२
प्रेरक प्रस्तावना – डॉक्टर प्रशांत सोनवतीकर	६
शुभेच्छा पत्र – डॉक्टर प्रवीण सोनवतीकर	११
शुभेच्छा – ज्योती सुनील साठे	१३
शुभेच्छा पत्र - श्री. विश्वास सोहोनी	१४
अभिप्राय - शुभेच्छा - श्री. सुरेश हांडे	१६
मी व माझे साठे कुटुंब	२०
माझा आजार – त्यावर केलेली आतापर्यंत मात	२३
उपचार पद्धती – प्रत्यारोपणाचा अवघड निर्णय	२६
पूर्व तयारी - शारीरिक आणि मानसिक	३१
कागदपत्रे, प्रतिज्ञा पत्रे, वैद्यकीय चाचण्या, डॉक्टरांबरोबर बैठका - प्रत्यारोपण परवानगी	३४
प्रत्यारोपण शस्त्रक्रिया - प्रत्यक्ष अनुभव	४४
जीवनदान व त्याचा आनंद – रुग्णालयातील दैनंदिनी आणि चिंतन	४९
शुभेच्छांचे पान	५२
रुग्णालयातून घरी	५५

रुग्णांसाठी माहिती ६४

आर्थिक मदत देणाऱ्या संस्थांची माहिती ६८

परिशिष्ट - संदर्भासाठी आभार ७८

संक्षिप्त परिचय

- सौ. विजया सुभाष साठे, (किडनी दान करणारी)
- सुभाष यशवंत साठे (लेखक आणि किडनी स्वीकारणारा)
- डॉ. ऋषी देशपांडे, नेफ्रोलॉजिस्ट ८०

“प्रकाशिकेचे मनोगत”

"साद दैवाची - साथ विजयाची" हे पुस्तक प्रकाशित करताना मला मनस्वी आनंद होत आहे. ह्या मध्ये लेखकाने म्हणजेच श्री.सुभाष साठे यांनी स्वतःचा नकाराकडूनचा प्रवास होकाराकडे कसा होत गेला आणि त्यात स्वतःची होकारार्थी बैठक कशी पक्की होत गेली आणि त्यात त्यांना किती जणांची मदत झाली हे स्पष्ट केले आहे.

त्याचबरोबर लेखकाने कोणाही मूत्रपिंड विकार असलेल्या रुग्णाला दिलासा मिळावा, माहिती मिळावी म्हणून काही गोष्टी स्पष्ट केल्या आहेत, जसे कि रुग्णालयाची यादी, लागणारी कागदपत्रे, कोणत्या तपासण्या गरजेच्या आहेत, कोणत्या संस्था आर्थिक मदत करतात हे सारे स्पष्ट केले आहे.

ह्या सगळ्या कार्यभागात श्री. सुभाष साठे यांना विश्वास दिला तो मूत्र पिंड विकार तज्ज्ञ डॉक्टर ऋषी देशपांडे यांनी आणि मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी होऊन आता जवळपास पाच महिने होत आले आणि हे पुस्तक देखील तयार झाले.

सक्तीच्या विश्रांतीचा श्री. सुभाष साठे यांनी योग्य वापर करून पुस्तक लेखन केले. त्यांना माझ्या खूप खूप शुभेच्छा ! तसेच श्री. सुभाष साठे यांजकडून वेगवेगळ्या विषयावर आणखी लेखन व्हावे आणि प्रकाशनाची संधी त्यांनी द्यावी असे म्हणून माझे मनोगत पूर्ण करते. हे माहितीपर पुस्तक वाचकांना नक्कीच आवडेल याची मला खात्री आहे.

सौ. विजया सुभाष साठे

“सुभाष्य”

भाष्य हे एखाद्या विचारवंताचे, दृष्ट्याचे असते. सत्य गोड शब्दांमध्ये सांगणे माझ्या नावाप्रमाणे मला आवडते. ऐकणाऱ्यालाही ते आनंद देते आणि त्या अर्थाने म्हणजे सुभाष्यति इति सुभाष: याच जाणीवेने मी आपल्यापुढे माझंही मनोगत व्यक्त करतो आहे.

जानेवारी २०२१ पासून माझ्या रक्तातील "क्रिएटीन" चे प्रमाण वेगाने वाढू लागले. इतकी वर्षे दबा धरून असलेल्या आणि वंश परंपरेने आलेल्या माझ्या भावंडांच्या आणि माझ्या वाट्याला आलेल्या "पॉलीसिस्टिक किडनी रोगाने" माझ्या शरीरावर जोरात हल्ला चढवायला सुरवात केली.

पुढे शरीरात असे काही बदल झाले आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार माझी "मूत्रपिंड प्रत्यारोपण" शस्त्रक्रिया माझी पत्नी सौ. विजया साठे हिने खंबीर राहून किडनी दान दिल्यामुळे यशस्वी झाली. मला नवं जीवन दान मिळाले. आमच्या दोघांची अवघड शस्त्रक्रिया यशस्वी रित्या डॉ. ऋषी यांच्या नेतृत्वाखाली पूर्ण झाली. अशा डॉ. ऋषी देशपांडे यांच्या सारख्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे खरं तर आम्ही कायमचे ऋणीच आहोत. त्यांचे, त्यांच्या टीम चे तसेच डॉक्टर रावल, डॉक्टर लालमलानी आणि त्यांच्या टीम चे जाहीर आभार व्यक्त करून कृतज्ञता व्यक्त करावी म्हणून मी हे पुस्तक लिहिण्यास रुग्णालयात असतानाच ठरविले.

रुग्णालयात विश्रांती घेत असताना एकीकडे वेदना सुरु असायच्या आणि अनेक विचार डोक्यात घोंघावयाचे. त्याच चिंतनातून आता सक्तीच्या विश्रांतीचा आणि मिळालेल्या नवीन जीवनाचा आणि प्रत्येक दिवसाचा १०० टक्के

सदुपयोग करावा असे राहून राहून वाटू लागले आणि "**साद दैवाची - साथ विजयाची**" हे पुस्तक लेखनाची प्रेरणा सुचली. मग खालील उद्देश नजरेसमोर ठेवून मी हे पुस्तक पूर्ण केले.

- डॉ ऋषी देशपांडे यांच्याबद्दल, त्यांच्या शैलीबद्दल वाचक, रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक यांना माहिती कळावी
- प्रत्यारोपण प्रक्रिया, त्यातील कायदेशीर बाबी, अत्यावश्यक प्रमाणपत्रे, वैद्यकीय चाचण्या, शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत करणाऱ्या संस्थांची माहिती, रुग्ण आणि अवयव दान इच्छुक व्यक्तींच्या यादी बद्दल माहिती वाचकांना, रुग्णांना कळावी. इतक्या कागदपत्रांची पूर्तता पद्धतशीर रित्या करता येते असा विश्वास आणि धीर रुग्णांना मिळावा.
- शस्त्रक्रियेनंतरच्या विश्रांतीचा उपयोग पुस्तक लेखनास व्हावा.

माझ्या नव्हे तर आमच्या दोघांच्या अवघड शस्त्रक्रियेकरिता डॉक्टर ऋषी देशपांडे आणि त्यांची टीम, डॉक्टर रावल, डॉक्टर लालमलानी आणि त्यांची टीम, आमचा सुपुत्र "शंतनू", "स्नुषा रमा", रघुराज (राजू मामा) आणि भरतराज मामा (संजू मामा), सौ नंदा आणि वैशाली मामी, भाचा निलेश, माझी ज्योती वाहिनी आणि पुतण्या सर्वेश, माझा भाऊ महेश आणि त्याची पत्नी मधुरा, माझे मेहुणे (माझ्या ताईचे यजमान) श्री. आबा भिडे या सर्वांचा मी कायम ऋणी असणार आहे.

त्याचबरोबर असंख्य मित्र मंडळी, शेजारी आणि दूरदूरचे नातेवाईक यांनी दिलेल्या शुभेच्छांचे "बळ" आमच्या बरोबर होते. त्या सर्वांचेही मनस्वी आभार.

डॉ. प्रशांत सोनवतीकर, MBBS, DMRD, औरंगाबाद, हे डॉ. ऋषी देशपांडे यांचे MBBS पासूनचे खूप जवळचे मित्र. म्हणूनच मी डॉ. प्रशांत सोनवतीकर यांनाच पुस्तकासाठी "प्रस्तावना" लिहिण्यासाठी विनंती केली. त्यांनी आनंदाने लगेचच होकार दिला आणि "गेल्या कित्येक वर्षांचे त्यांचे डॉ. ऋषी देशपांडे यांच्याशी असलेले मैत्रीचे नाते, डॉ. प्रशांत यांचे कुलकर्णी-साठे कुटुंबाशी

असलेले नातेसंबंध लक्षात घेऊन अनेक गोष्टी उलगडून सांगितल्या आणि खूपच सुंदर आणि "प्रेरक प्रस्तावना" लिहून पाठविली. "प्रस्तावनेत" डॉ. प्रशांत यांनी अशा कितीतरी सामाजिक मुद्यांना स्पर्श केला आहे आणि हे पुस्तक लिहिण्यामागचा माझा उद्देश अधिक उलगडून वाचकांसमोर येण्यास फार मोठी मदत होणार आहे. त्यांच्या प्रस्तावनेमुळे या पुस्तकाचा दर्जा खूपच उंचावला आहे. त्यांचे शतशः आभार!!

या पुस्तकाचे भाग्य थोर कि डॉ. ऋषी देशपांडे यांच्या संदर्भातील पुस्तकाला दोन डॉक्टरांचा सक्रिय हातभार लागला. डॉ. प्रशांत यांच्याप्रमाणेच डॉ. प्रवीण सोनवतीकर, ENT & HEAD NECK SURGEON, यांनी अगत्यपूर्वक रुग्णालयाचा व्याप सांभाळून पुस्तकाला "शुभेच्छा पत्र" लिहून पाठविले. शुभेच्छा पत्रामध्ये त्यांनी पुस्तकाचा उद्देश अधिक स्पष्ट करताना पुस्तकात उद्धृत केलेल्या डॉक्टरांची तपासणी, त्यांची मते, त्यांनी केलेले कॉउंसिलिंग, झालेल्या मुलाखती, काय काय तपासण्या करतात, काय मदत मिळू शकते, अनेक वैद्यकीय संज्ञांचे अर्थ या सर्वांचा अधिक उलगडा पुस्तकात कसा केला आहे याचे थोडक्यात सुंदर चित्रण मांडले आहे. डॉ. प्रवीण यांच्या शुभेच्छांमुळे पुस्तकाची उंची वृद्धिंगत होण्यात फार मोठी मदत झाली आहे. डॉ. प्रवीण याना मनस्वी धन्यवाद!

पुस्तक लेखनाच्या कल्पनेला माझी वाहिनी श्रीमती ज्योती सुनील साठे, माझे मित्र प्रशांत विजय दांडेकर या दोघांची फार मोठी सक्रिय मदत झाली. त्यांचे मौलिक मार्गदर्शन व त्यांनी केलेल्या सूचना यामुळे पुस्तकाला एक वेगळेच परिमाण लाभले आहे. त्याच बरोबर पत्नी सौ. विजया आणि पुत्र शंतनू यांनी देखील वेगळे पैलू दाखवून पुस्तकात विचारांची भर घातली. या सर्वांचे मनापासून आभार.

या पुस्तकाचे भाग्य थोर की नाट्य दिग्दर्शनाच्या क्षेत्रात दबदबा असलेले एक नाव म्हणजे नामवंत दिग्दर्शक श्री.विश्वास सोहोनी यांचे अतिशय सुंदर शुभेच्छा पत्र आणि अत्यंत बोलकी प्रतिक्रिया पुस्तकाला लाभली. श्री.विश्वास यांनी

असंख्य तरुणांना मार्गदर्शन करून आंतर महाविद्यालयीन नाट्य स्पर्धेत उतरविले आणि अनेक पारितोषिके पटकावून दिली आणि गम्मत म्हणजे हा अवलिया धडपडणाऱ्या तरुणांमध्ये या वयात देखील वावरताना त्यांना ऊर्जा देत राहतो आणि स्वतः आनंद घेतो. श्री.विश्वास सोहोनी यांचे "आभार" असे लिहावयास मला "आभार", "धन्यवाद" हे शब्द खूप खुजे वाटतात.

माझे जिवलग मित्र श्री.सुरेश हांडे यांनी पुस्तकातील बारकावे टिपून अतिशय सुंदर पद्धतीने त्याची मांडणी करून खूप छान प्रतिक्रिया आणि शुभेच्छा पाठविल्या त्यासाठी त्यांचे विशेष आभार मानताना मला खूप आनंद होतो आहे.

पुस्तकाचे वेगळेपण त्याच्या मुखपृष्ठ, त्यातील रंग संगती, छोटेखानी बांधणी इत्यादींचे भान ठेवून ते उत्कृष्टच होईल याची पुरेपूर काळजी घेत त्या संदर्भातील संपूर्ण काम वेळेवर पूर्ण केल्याबद्दल, कलावंत मनोवृत्तीचा, माझ्या मुलाचा जिवलग मित्र श्री. अमेय साने याचे आभार आणि कौतुक करावयास मला शब्द अपुरे वाटतात.

वाचक या पुस्तकातील माहिती रुग्णांना, त्यांच्या नातेवाईकांना सांगतील अशी मी आशा करतो आणि वाचकांनी आपले उत्स्फूर्त अभिप्राय, सूचना जशा मनात उमटतील तशा त्वरित माझ्या ई-मेल वर / भ्रमण ध्वनी क्रमांकावर पाठवाव्यात अशी नम्र विनंती करून “सुभाष्य” थांबवितो.

आपला

सुभाष यशवंत साठे

“प्रस्तावना”

चांगल्या हेतूने एखादी गोष्ट केली जात असेल, मूर्त रूप घेत असेल आणि आपल्याला त्याचा कुठल्या ना कुठल्या स्वरूपात भाग होता येत असेल तर ती मनाला अतिशय सुखावणारी बाब होते आणि नेमकी तीच अनुभूती ही प्रस्तावना लिहीत असताना मी घेतोय.

एखाद्या कुटुंबात किडनी विकाराने ग्रस्त, विशेषतः किडनी फेल्युअर असलेला रुग्ण असेल तर पूर्ण कुटुंबाची दैनंदिनी विस्कळीत होत असते आणि यातील प्रत्येक पुढील टप्प्यावर वाढत्या वैचारिक दोलायमान स्थितीला त्यांना सामोरे जावे लागते.

अशा रुग्ण व त्यांच्या कुटुंबियांना या स्थितीला तोंड देताना थोडासा धीर, दिलासा, उभारी, मार्गदर्शन, माहिती मिळावी व सारासार विवेकबुद्धीने निर्णय घेण्यास मदत होईल हे घ्यानात घेऊन या पुस्तकाचा घाट श्री. सुभाष साठे यांनी घातला, जो अतिशय उदात्त आहे.

नाटक, कविता, वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व या गोष्टींशी निगडित असून देखील "प्रस्तावना" पहिल्यांदाच लिहीत असल्यामुळे ती नेमक्या कशा स्वरूपात कागदावर मांडावी असा प्रश्न मला पडला पण त्यावर उत्तरही तात्काळ सुचले. या पुस्तकातील मुख्य व्यक्तिमत्वे "श्री. सुभाष साठे, सौ. विजया साठे आणि डॉ. ऋषी देशपांडे” ही ठळक पात्रे म्हणून आणि त्यांच्याशी माझा असलेला संबंध मी माझ्या कुवतीप्रमाणे आजवर जो काही टिपू शकलो तो जसा लिहिण्याच्या ओघात सुचत जाईल तसाच तो मांडत राहावा हे मनोमन निश्चित केले आणि शब्द कागदावर उतरत राहिले ते असे...

सौ. विजया साठे म्हणजे आमची सुधाताई, माझी मोठी चुलत बहीण आणि श्री. सुभाष साठे तिचे यजमान. आम्ही सगळे त्यांना अण्णा म्हणतो. अतिशय सालस आणि लाघवी अशी ही जोडी (लक्ष्मी नारायणाचा जोडा). सुधाताई शांत, सुलझी हुई अशी, जिच्या अशा सुस्वभावाचे गारुड तर आमच्यावर लहानपणापासून आजतागायत आहे.

श्री. सुभाष साठेना "पॉलीसिस्टीक किडनी डिसीज" (Autosomal Dominant Polycystic Kidney Disease) हा आनुवंशिक (Hereditary) जीन डिसऑर्डर (Gene Disorder) - किडनी विकार होता. वाढत्या वयासोबत किडनी फेल्युअरच्या दिशेने बळावत चालला होता. यासंदर्भात सुपरस्पेशालिस्ट - किडनी विकार तज्ञ (Nephrologist) यांच्या सल्ल्याने ट्रीटमेंट घेणे गरजेचे होते.

माझा MBBS पासूनचा वर्गमित्र डॉ. ऋषी देशपांडे (MBBS, MD, DNB, DM, Nephrology) हा अतिशय हुशार, अभ्यासू, प्रतिथयश नेफ्रोलॉजिस्ट म्हणून मुंबईत प्रॅक्टिस करीत होता. श्री. साठेना त्याचा सल्ला घेण्याबाबत मी निर्धोकपणे सांगितले.

काही लोकं वरदहस्त घेऊनच जन्माला आलेले असतात, डॉ. ऋषी त्यापैकीच एक**!** मेडिकलच नव्हे तर कुठलेही क्षेत्र असते तरी आणि मेडिकलमधील इतर कुठलीही ब्रँच असली असती तरी हा आता इतकाच यशस्वी राहिला असता असा खासा. बरं, नुसता अभ्यासू नाही, तर अष्टावधानी, सामाजिक स्थितीचे भान असणारा, क्षणात समोरच्याची मानसिक स्थिती टिपू शकणारा अवलिया - मेधावी, प्रज्ञावंत व्यक्तिमत्त्व. परदेशातून मायदेशी परतण्याचा त्याचा निर्णय आपल्याकडील कितीतरी रुग्णांसाठी वरदान ठरला आणि आम्ही त्यापैकीच एक**!** असा डॉक्टर, आपला डॉक्टर म्हणून लाभणे, यालाही नशीबच लागते.

श्री. साठेंचा किडनी विकार हळूहळू वाढत या स्थितीत पोहोचला (जे साधारण ६० ते ७० वर्षे वयापर्यंत "पॉलीसिस्टीक किडनी डिसीजच्या" बऱ्याच रुग्णांमध्ये

natural course मध्ये घडून येते) आणि यापुढे ट्रीटमेंट ही डायलिसिस (Dialysis) ही असावी कि किडनी ट्रान्सप्लांट (Kidney Transplant) हे ठरविणे गरजेचे झाले. याविषयी डॉ. ऋषीची भूमिका एकदम स्पष्ट आणि ठाम होती. विषयातील नैपुण्यासोबतच मोजक्या शब्दांत योग्य तो संदेश समोरच्या प्रत्येक मेडिको अथवा नॉन मेडिको व्यक्ती पर्यंत (इथे मेडिको मी आणि नॉन मेडिको व्यक्ती म्हणजे श्री. साठे आणि इतर आप्त) पोहोचवण्याची त्याची वाखाणण्याजोगी हातोटी तर मी जवळपास ३० वर्षापासुन जाणून होतो. या सर्व प्रकरणात मी दुहेरी भूमिकेत होतो...डॉक्टरही आणि नातेवाईक हि देखील. किडनी ट्रान्सप्लांट हे आमच्या रुग्णाच्या सद्यस्थितीत वैद्यकीय शास्त्राच्या दृष्टीने गोल्ड स्टँडर्ड (Gold Standard) आहे, हे डॉ. ऋषी कडून आम्हाला कळलेच होते. या संबधी कधी कधी होऊ शकणाऱ्या गुंतागुंतीची (Complications) जाण मात्र मला होती. यावेळी श्री. साठे व परिवार हलक्याश्या द्विधा मन: स्थितीत होता पण सगळ्यांनी सर्वांगाने परिस्थितीचा केलेला सखोल अभ्यास, सौ. विजया (सुधाताई) साठे व श्री. सुभाष साठे यांनी धीरोदात्त राहून केलेला किडनी ट्रान्सप्लांटचा दृढ निश्चय, निर्णय... हे सर्व काही मोठ्या खुबीने या पुस्तकातुन आपल्या समोर येत गेले आहे; जे प्रेरक आहे आणि माहिती पुरवणारेही आहे आणि तोच हे पुस्तक लिहिण्यामागचा हेतू आहे जो मला साध्य होतानाही दिसून येत आहे.

श्री. साठेना किडनी देण्यासाठी तिघांची तयारी होती. कुठलेही दान हे श्रेष्ठच. वैद्यकीय क्षेत्रातच असल्यामुळे अवयदानाचे महत्व तर मी जाणून आहेच. त्यातही आपल्या हयातीत अवयवदान करण्याची तयारी ही अति श्रेष्ठ! ज्याची महती कितीही शब्दभांडार रिते करून लिहिली तरी कमी ठरेल. त्यामुळे त्याविषयी जास्त लिहिणे टाळतो. किडनी देण्यासाठी श्री. साठेंची पत्नी सौ. विजया साठे (सुधाताई), त्यांचे सुपुत्र श्री. शंतनू साठे, आणि त्यांचे कनिष्ठ बंधू श्री. महेश साठे हे तिघे जण तयार होते. त्यांना माझा सलाम!!!

मेडिकल कारणास्तव श्री. महेश साठे यांची, कमी वय आणि इतर जबाबदारी

लक्षात घेता श्री. शंतनू साठे यांची किडनी प्रत्यारोपणासाठी घेणे अशक्य होते आणि सुधाताईंची घेणे शक्य होते. तिच्या बाबतीतही रक्त गटासंबंधित कारण बाधा ठरू शकले असते पण आता वैद्यकीय क्षेत्र इतके प्रगत झाले आहे कि या समस्येवर मात करणे शक्य झाले.

एकूण दोघांवर (सौ. विजया साठे आणि श्री. सुभाष साठे) शस्त्रक्रिया करावी लागणार होती. "डोनर" आणि "रेसिपीयन्ट" वर "गंभीर / मोठ्या (Major)" स्वरूपाच्या या सदरात मोडणाऱ्या शस्त्रक्रिया...साधारणपणे जवळच्यांच्या अशा शस्त्रक्रियांच्यावेळी थोडासा ताण येत असतोच आणि क्षेत्रामुळे निगडित माहितीमुळे आणखी जास्त शक्यता...पण...नवल...मला असा ताण (Tension / Botheration) बिलकुलच नव्हते... का बरे? बहुतेक माझे डॉ. ऋषी ला इतक्या वर्षांपासून त्याच्या हुशारी क्षमतेसहित ओळखणे व त्याच्यावरील ठाम विश्वास हीच कारणे असावीत. डॉ. ऋषी व त्याच्या टीम कडून ही कामगिरी सफाईदार व सराईतपणे पार पडली. त्यांचे शतशः आभार!!

डॉ. ऋषीचे आजवरचे किडनी विकार तज्ञ् म्हणून केलेले काम अतिशय स्पृहणीय, कौतुकास पात्र ठरावे असेच आहे. यामुळे खरे तर त्याचा उल्लेख आदराने अहो-जाहो या स्वरूपात असायला हवा पण वर्ग सवंगडी तसेच जवळचा मित्र असल्यामुळे तसा उल्लेख व त्यामुळे येऊ पाहणारा औपचारिकपणाही मी टाळला.

झपाट्याने बदलती समाज मानसिकता, त्याचे " डॉक्टर - पेशंट " यांच्यातील बदलत जाणाऱ्या रिलेशनशिपमधून आजकाल वारंवार दिसून येणारे प्रतिबिंब, अशा काळात एखाद्या पेशंटला आपल्या डॉक्टरांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पुस्तक लिहावे असे उस्फुर्तपणे वाटणे ही असीम आनंद देणारी गोष्ट आहे...त्यातून पेशंट - लिहिणारे आमचे अण्णा - श्री. सुभाष साठे आणि डॉक्टर माझा मित्र - डॉ. ऋषी**!!** या बाबी मलाच माझ्या नजरेत स्पेशल फील (एक अवर्णनीय आनंद, समाधान) देऊन जात आहेत.

याच अवस्थेत मग्न राहत ही प्रस्तावना थांबवतो.....

डॉ. प्रशांत रवींद्र सोनवतीकर
MBBS, DMRD, (Radiology)
औरंगाबाद

!!शुभेच्छा पत्र!!

"साद दैवाची - साथ विजयाची" ह्या श्री. सुभाष साठे यांनी लिहिलेल्या पुस्तकाला "शुभेच्छा" देण्यासाठी जेंव्हा मी विचार करू लागलो तेंव्हा सर्वप्रथम मला खालील वाक्ये मनात रुंजी घालू लागली.

"असे म्हणतात कि नवऱ्याच्या मनाचा मार्ग हा पोटातून जातो आणि खरोखरच माझ्या बहिणीने सौ. विजया सुभाष साठे, हिने अतिशय खंबीर राहून स्वतःच्या नवऱ्याला "किडनी" देऊन त्याच्या पोटामध्ये शिरकाव केला. मनात तर ३६ वर्षांपूर्वीच केला होता".

हे पुस्तक लिहिण्या मागे श्री. सुभाष साठे यांची अशी भावना होती कि लोकांमध्ये जे गैरसमज आहेत ते दूर व्हावेत. भीती आहे ती नाहीशी व्हावी. त्यांना असे वाटत होते कि आपण ज्या अनुभवातून गेलो, त्याचा जास्तीत जास्त फायदा लोकांना, समाजाला व्हायला हवा. केवळ याच चांगल्या भावनेने सुभाष साठे यांनी ह्या पुस्तकाचा उपक्रम पूर्ण केला आहे. त्यामध्ये स्वतःला आलेले विविध अनुभव त्यांनी उद्धृत केले आहेत. डॉक्टरांची तपासणी, त्यांची मते, त्यांनी केलेले कॉउंसिलिंग, झालेल्या मुलाखती, काय काय तपासण्या करतात, काय मदत मिळू शकते, अनेक वैद्यकीय संज्ञांचे अर्थ अशा अनेक पद्धतीने साठे यांनी हे पुस्तक परिपूर्ण करायचा प्रामाणिक प्रयत्न केलेला दिसतो. आयुष्यातील अनेक जबाबदाऱ्या त्यांनी व्यवस्थित आणि आनंदाने जशा पूर्ण केल्या तसेच ह्या पुस्तकाचे काम देखील स्वतःच्या मनाने आनंदाने आणि लोकांच्या भल्यासाठी केले आहे. त्यांच्या सर्व कामात देव यश देतो

तसेच या पुस्तकाला सुद्धा चांगला प्रतिसाद मिळेल. श्री. सुभाष साठे यांच्या

नेहेमीच्या विनोदी शैलीची झलक या पुस्तकात देखील प्रत्ययास येते. ते सहजी लिहून जातात “माझ्या पोटात जिथे किडनीने आपले साम्राज्य पसरवले होते तिथे खूप वेदना होऊ लागल्या”.

आमच्या सगळ्यांच्या "शुभेच्छा" सुभाष साठे यांच्या पाठीशी आहेतच!!!

डॉक्टर श्री. प्रवीण सोनवतीकर,
M.S.
ENT & HEAD NECK SURGEON,
औरंगाबाद

!!शुभेच्छा!!

सस्नेह नमस्कार,

सकारात्मक दृष्टिकोन समोर ठेवून कसे जगावे याचे उत्तम उदाहरण म्हणजे आमच्या कुटुंबातील श्री. सुभाष साठे (अण्णा) आणि सौ.विजया साठे अर्थात, माझे मोठे दिर आणि मोठया जाऊबाई. "साद दैवाची साथ विजयाची" हे पुस्तक म्हणजे वैचारिक सकारात्मकतेचे बोलके उदाहरण आहे. किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया झाल्यावर वेदना सहन करीत असतानाच या पुस्तकाचा आराखडा अण्णांनी मनात निश्चित केला आणि घरी आल्यावर पुस्तकाचे लेखन आणि डॉक्टर नी दिलेल्या सूचनांचे पालन असे वेळापत्रक तयार करून इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषेत पुस्तके आकाराला आली. या पुस्तक निर्मिती मध्ये मी खारीचा वाटा उचलू शकले याचा मला खूप आनंद आहे. हे पुस्तक किडनी पेशंट आणि त्यांचे नातेवाईक याना मार्गदर्शक ठरेल असा विश्वास वाटतो. या त्यांच्या उपक्रमाला मनापासून शुभेच्छा देऊन आमच्या अण्णा वाहिनीना दीर्घायुष्य लाभावे ही ईश्वर चरणी प्रार्थना करते व या पुस्तकाचे मार्गदर्शन लोकांना लाभावे यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा देते.

ज्योती सुनील साठे.

विरार (पश्चिम)

प्रिय सुभाष आणि सौ. विजया साठे,

नमस्कार!

दुःखाला स्वर देणाऱ्या माणसांना "साल्व्हादोर दाली (Salvador Dalí)" याने आपला पहिला प्रणाम सांगितला आहे.

पहिला प्रणाम सौ.विजया या तुझ्या प्रिय पत्नीला आणि वारसाहक्काने मिळालेल्या दुखण्यावर तू मात केलीस म्हणून तुलाही.

नैतिक मूल्यांचा नुसता उच्चार जरी केला तरी तो विनोद वाटेल अशा जमान्यात तुम्ही दोघांनी दाखविलेले एकमेकांवरील प्रेम आणि तुमच्या स्नेह्यांनी दाखविलेली माणुसकी जगाला एक वेगळीच उमेद आणि उभारी देतील. त्यामुळे माझा आंतरिक विश्वास असा सांगतो की तुमचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे. सौ.विजयाने घेतलेल्या किडनी दान करण्याच्या ठाम निर्णयापासून ते किडनीच्या यशस्वी रोपणा पर्यंत कुटुंब, नातेवाईक आणि स्नेही यांच्यावर येणारा मानसिक ताण, हॉस्पिटल कॉरिडॉर मधल्या तणावयुक्त येरझाऱ्या, औषधांचा आणि वैद्यकीय तपासण्यांचा भडीमार हे सगळे मला कल्पनेतही भयावह वाटते. पण तुम्ही ते झेपवलत. सौ.विजया हिची किडनी तुला मॅच होते त्यातला हा आनंद वगळता तुमचा मुलगा शंतनू, सुनबाई आणि दुधावरची साय म्हणजे तुमची नातं, मार्गदर्शक मित्र परिवार आणि डॉक्टर्स शिवाय ज्ञात अज्ञात सहकार्यांना मनःपूर्वक दंडवत.

तुम्हा सर्वांच्या प्रयत्नांना आणि प्रार्थनेला श्रद्धेचे बळ आहे. सौ.विजया तू खरोखर ग्रेट आहेस. पैसे उभे राहतात पण माणसे आपल्या पाठीशी उभी राहिली की त्याचा आनंद मोठा. या अनुभवाला पुस्तक होण्याचे भाग्य लाभले हे मोठे

समाधान. आता काळजी तर तुम्हा दोघांना घ्यावी लागेल पण याला यशाचे / आनंदाचे पाठबळ आहे. आता पक्ष्यांचा किलबिलाट, उत्तम संगीत ऐका. उत्तम साहित्य वाचा. चित्रपट पहा. छान पाऊस खिडकीतून पहा. आयुष्याचा आस्वाद घ्या. माणूस म्हणून जगण्याचे भाग्य तुम्हा सर्वाना मिळाले म्हणून आयुष्याचे आपण ऋणी राहूया.

पुन्हा तुम्हाला मनःपूर्वक नमस्कार आणि शुभेच्छा!

विश्वास सोहोनी

!!अभिप्राय - शुभेच्छा!!

सुभाष, तुम्ही लिहिलेले "साद दैवाची - साथ विजयाची" पुस्तक एका बैठकीत पूर्ण वाचून झाले. प्रथम तुमचे अभिनंदन करतो पुस्तक लिहिण्याच्या तुमच्या उद्देशाबद्दल. आपण किडनी प्रत्यारोपण प्रक्रिया झाल्यानंतरच्या मिळालेल्या सक्तीच्या विश्रांतीच्या वेळात त्या आजाराबद्दल सामान्य लोकांना जर यदाकदाचित या आजाराला तोंड द्यावे लागले तर त्यांनी कोणती काळजी घावी, कोणकोणत्या हॉस्पिटलला ही किडनी प्रत्यारोपणाची प्रक्रिया केली जाते, त्याची सविस्तर माहिती देऊन येणारा खर्च हा मोठया प्रमाणात असल्यामुळे मदतीचा हात पुढे करणाऱ्या कित्येक संस्थांची इथंभूत माहिती दिलेली आहे. आपण खरोखरच खूप छान काम केले आहे.

आपल्याला हा किडनीचा दुर्दम्य आजार अनुवांशिक पद्धतीने आपल्याकडे आला ज्या आजाराने तुमची आई, भाऊ आणि बहीण तुमच्यापासून हिरावून नेले आणि ज्या वेळेला तुम्हाला स्वतःला आजाराची प्रत्यक्ष जाणीव झाली तेंव्हा तुम्ही आता तो माझ्या जीवावर उठलेला आहे असे कसे काय म्हणू शकता ? मनाचा धीर गंभीर पणा, त्याला सामोरे जाण्याची तयारी आणि नंतर तुमचे संपूर्ण कुटुंब तुमच्या पाठीशी उभे राहिले फक्त तुमच्या पत्नीनेच नव्हे तर तुमचा मुलगा आणि भाऊ यांनी देखील तुम्हाला किडनी देण्याची तयारी दर्शविली आहे, हे तुमच्यावर असलेल्या अमोघ प्रेमाचे जिवंत उदाहरण आहे. तुमच्या पत्नीने तुम्हाला किडनी दान केली त्यावेळी तुम्ही तुमच्या पत्नीबद्दल उच्चारलेले शब्द अतिशय बोलके आहेत. ३६ वर्षांपूर्वी ती मनानेच माझ्याशी एकरूप झाली आणि आता खऱ्या अर्थाने ती माझ्या शरीरामध्ये असून आम्ही एकजीव झालो आहोत. किती उत्तम विचार आणि शब्द! माझ्या मनाला खूप

सुखावून गेले.

आपल्या "किडनी ट्रान्सप्लांट" च्या प्रक्रियेमध्ये सामावलेले डॉक्टर, त्यांचा समूह, नर्सेस आणि इतर रुग्णालयाचा स्टाफ या सर्वांचा आपण नावानिशी तुम्ही उल्लेख केलेला आहे. हे कौतुकास्पद आहे. तुमचे सर्वच नातेवाईक आणि असंख्य मित्रपरिवार या सगळ्यांचा तुम्ही तुमच्या या पुस्तकामध्ये त्यांनी केलेल्या अनमोल मानसिक, आर्थिक पाठबळाची उल्लेख केलेला आहे. खरोखरच अशा प्रकारच्या दुर्दम्य आजारामध्ये मानसिक आणि भावनिक पाठिंब्याची अत्यंत गरज असते. त्यामुळे आजारी माणसाचे मनोबल वाढते आणि तो त्या आजाराला सामोरे जाऊ शकतो. तुमच्यावर प्रेम करणाऱ्या असंख्य माणसांनी तुम्हाला हा सपोर्ट दिल्यामुळे तुम्ही किडनी ट्रान्सप्लांट च्या प्रक्रियेमध्ये यशस्वी झालेले आहात. एवढेच नव्हे तर सक्तीच्या विश्रांतीच्या कालखंडामध्ये शारीरिक वेदना होत असताना सुद्धा मिळालेल्या वेळेचा सदुपयोग स्वतःचा अनुभव लिखित स्वरूपात आणू शकला हे तुमच्या प्रगल्भ इच्छाशक्ती आणि मनोबलाचे प्रतीक आहे.

सुभाष, तुम्ही लिहिलेल्या पुस्तकाला भरभरून प्रतिसाद मिळेल याची मला खात्री आहे. कारण, ते सर्वांना मार्गदर्शन करणारे आहे. आपल्या इच्छाशक्ती, सकारात्मक विचार आणि आपले मनोबल याला माझा शतशः प्रणाम!! आपल्याला आयुरारोग्य उदंड लाभो ही मी या परमेश्वराच्या चरणी प्रार्थना करतो.

आपला परममित्र,

सुरेश हांडे



मी व माझे साठे कुटुंब

खरं तर हा क्लीष्ट किचकट अन गंभीर आजार मला आणि माझ्या सर्व भावंडाना आहे याची स्पष्ट कल्पना डॉ झोपे यांनी २००२ साली जेंव्हा आमची प्रिय आई खूप आजारी होऊन तिला पॉली सिस्टिक किडनी आजार असल्याचे निदान केले आणि आम्हा सर्व भावंडाना त्वरित सोनोग्राफी करावयास सांगितले तेंव्हाच आली. आई दीड वर्षे डायलीसीस वर होती आणि २००३ साली ती देवाघरी निघून गेली. सप्टेंबर २०१३ साली माझ्या लहान भावाचा प्रिय सुनील यशवंत साठे चा हाच आजार बळावला आणि काही महिन्यांचे औषोधोपचार डायलीसीस निष्फळ ठरून १४ नोव्हेम्बर २०१४ साली सुनील आम्हाला कायमचा सोडून गेला. २०१८ पासून माझ्या ताईचे - प्रिय सौ. प्रतिभा प्रमोद भिडे हिचे क्रिएटिन वेगाने वाढू लागले. तिलाही २०१९ पासून डायलीसीस उपचार सुरु झाले. परंतु तिची तब्येत दिवसेंदिवस खंगत जाऊन तिलाही ६ जुलै २०२० साली देवाज्ञा झाली. त्यांच्या आठवणीने आजही मनात काहूर उठते आणि डोळ्यात अश्रू दाटून येतात.

त्यांच्या पवित्र स्मृतीस नम्रतापूर्वक मी ही पुस्तिका अपर्ण करीत आहे आणि जिथे ते असतील तिथे ते सुखात राहोत अशी देवाकडे मनोमन प्रार्थना करीत आहे.

१९८२ साली मी लार्सन टुब्रो पवई येथील मनुष्य बळ विकास खात्यात लघुलेखक म्हणून नोकरीस लागलो. २००० सालापर्यंत ट्रेंड अप्रेन्टिस नेमणूक, डेटा सांभाळणे, विविध यांत्रिकी अभियांत्रिकी विद्यालयांशी पत्र व्यवहार करणे, अभियांत्रिकी पदवी आणि पदविका उत्तीर्ण झालेले विद्यार्थी जे दरवषी कंपनीत भरती व्हावयाचे अशांसाठी विविध छोट्या मोठ्या कंपनीतील अभ्यासक्रमाचे

कार्यक्रम आणि त्यांची तयारी करून देणे, निवड प्रक्रियेत मदत करणे, वेळ प्रसंगी कार्यक्रमात प्रोजेक्टर चालविणे अशी सर्व प्रकारची कामे आणि त्यासंदर्भातील पत्रव्यवहार स्वतंत्रपणे करायला मिळाल्यामुळे मला विविध अनुभव मिळाला. म्हणूच तोपर्यंत मी "अधिकारी" पदापर्यंत पोहोचलो.

२००० साली मला मिळालेले काम तर माझ्या खूपच आवडीचे होते. कंपनीतील अधिकारी वर्गासाठी महागाई भत्ता, बोनस, विविध प्रकाच्या सोयी सुविधांच्या योजनांच्या अटी आणि शर्ती युक्त मार्ग दर्शक परिपत्रकांचे पहिले लिखाण करणे, व्यवस्थापनाची अनुमती मिळताच त्यात आवश्यक ते सुचविलेले बदल करून अंतिम परिपत्रके तयार करणे यामुळे तर मला भरपूर आणि मनसोक्त लिखाण करायचा अनुभव मिळाला.

ते काम करीत असताना २०११ साली मला अधून मधून कारण नसताना निराश, हताश असे वाटायला लागले. मी कामावर जात होतो. कामात लक्षही लागत होते. पण मनावर उगाच ताण जाणवू लागला. मध्येच धाप लगे. एक दिवस संध्याकाळी मला चक्कर येऊ लागली. डॉक्टर सोनल चे औषध घेतले पण काही फरक जाणवेना. हातापायातील शक्तीच नाहीशी झाली. विजया, शंतनू यांनी रघुराज मामांना निरोप पाठविला. लक्षणे ऐकून त्यांनी डॉक्टर ऋषी देशपांडे याना फोन केला. डॉक्टर ऋषीनी साठेंना जसलोक ला ताबडतोब भरती करा, मी बेड मिळण्याची व्यवस्था करून ठेवतो. माझे कंपनीतील मित्र आणि आमचे खूप जवळचे शेजारी श्री. राकेश देवधर यांनी लगेच गाडी काढली आणि विजया, शंतनू, राकेश यांनी मला जसलोक मध्ये मध्य रात्री भरती केले. काही रक्त तपासण्या पार पडल्या.

सकाळी डॉक्टर ऋषी देशपांडे यांनी तपासून सांगितले कि साठेंच्या रक्तातील सोडियम चे प्रमाण खूप खाली गेले आहे. रक्तातील इतर घटक सुद्धा प्रमाण बाहेर खूप खाली वर झाले आहेत. आपण औषध योजना सुरु केली आहे. एक दोन दिवस अशाच स्थिती मध्ये मी पडून होतो. एक दिवस माझी शुद्धच हरपली. खूप प्रयत्नांनी मी शुद्धीवर आलो तेंव्हा माझ्या जवळ विजया, शंतनू,

रघुराज मामा सगळे होते पण मी कुणालाच ओळखले नाही. माझ्यासाठी ते सगळे कधी न बघितलेली माणसे होती. ते बिचारे सगळेच खूप घाबरले. डॉक्टर ऋषी नी त्यांना धीर दिला. त्यांनी पुढील उपायजोजना सुरु केल्या. माझा मेंदूचा आलेख काढला गेला. दुसऱ्याच दिवशी त्याचे रिपोर्ट्स मिळाले आणि तोपर्यंत माझे सोडियम चे प्रमाण वाढले. आता मी सर्वाना ओळखले. सर्वाना खूप आनंद झाला. २० दिवसांच्या प्रयत्नांनी रक्तातील सर्व घटकांचे प्रमाण योग्य ते झाले आणि मला घरी सोडण्यात आले. हा प्रकार म्हणजे म्हणजे शरीरात आधीच वास्तव्य करून असलेल्या "पोली सिस्टिक किडनी" रोगाने मध्येच वर काढलेले डोके होते. घरी सोडताना डॉक्टर ऋषी देशपांडे म्हणाले "आता क्रिएटिन, सोडियम, पोटॅशिअम, हिमोग्लोबिन, बिलिरुबिन इत्यादी घटकांच्या प्रमाणावर सतत नजर ठेवावी लागेल त्यामुळे औषध, रक्तचाचण्या आणि तपासणी दर तीन महिन्यातून किंवा गरज असेल तेंव्हा वेळ न घालविता जसलोक ला येऊन मला भेटणे यात खूप सातत्य ठेवावेच लागेल. तेव्हापासून माझे क्रिएटिन हळूहळू वाढू लागले होते. एक आठवड्याच्या विश्रांती नंतर मी कामावर रुजू झालो.

माझा आजार - त्यावर केलेली आतापर्यंत मात

जुलै २०१५ पर्यंत कंपनीत आणखी पदोन्नती घेऊन "असिस्टंट जनरल मॅनेजर - पेर्सोनेल ऍडमिनिस्ट्रेशन, कॉर्पोरेट ह्यूमन रिसोर्स अँड पेर्सोनेल" या पदावरून आनंदाने सेवानिवृत्त झालो.

“सुभाष्य” मध्ये वर्णन केल्याप्रमाणे मी नंतर लगेचच मित्र रवींद्र साळगावकर (दुर्दैवाने त्याचा मार्च, २०२० मध्ये हृदय विकाराचा झटका आल्याने मृत्यू झाला) याच्या मुळे परिचय झालेल्या वकील श्री.किशोर रणदिवे याच्या मदतीने मी वकिलीची "सनद" मिळण्याकरिता अर्ज केला. तीन महिन्यात मला "सनद" मिळाली सुद्धा. रवींद्र, रणदिवे आणि मी आम्ही अन्याय्य बडतर्फी, कर्मचाऱ्यांचा अडवून धरलेला भविष्य निधी, सेवानिवृत्ती अंशदान रक्कम संबंधित सरकारी कार्यालयात कायदेशीर पत्र व्यवहार करून मिळवून देणे, गरज पडली तर त्या संदर्भात दावा ठोकणे आणि न्यायालयीन प्रक्रिये द्वारे "ऑर्डर" मिळवून देणे, इच्छापत्र करून देणे, यासारखी कामे गरजू लोकांसाठी करून आनंद मिळवू लागलो.

जानेवारी २०१६ मध्ये माझे मित्र श्री. दिवाकर मेनन यांच्या सांगण्यावरून मी त्यांचा भाऊ श्री.राघवन मेनन याना भेटलो आणि "अर्ध वेळ सल्लागार" म्हणून हिंदुस्थान युनिलिव्हर, अंधेरी येथे काम पाहू लागलो. तिथे काम पाहत असताना मला अनेक वरिष्ठ वकिलांचे युक्तिवाद मुंबई उच्च न्यायालयात जाऊन ऐकायची संधी मिळाली आणि खूप निकाल पत्रांचे वाचन करायला मिळाले.

दीड वर्षानंतर छोट्या नातीला - श्रीमयी ला सकाळी ९ ते संध्याकाळी ६ पर्यंत शंतनू विजया कामावरून घरी परत येईपर्यंत लक्ष ठेवण्या साठी म्हणून मी

HUL मध्ये जाणे बंद केले आणि जुलै २०१८ पासून माझा एकदम वेगळ्याच "क्षेत्रात" प्रवेश झाला.

श्रीमयी ला सांभाळायला सकाळी ८.३० ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत "अनुभवी मुलगी" होतीच. माझे काम म्हणजे श्रीमयी वर लक्ष ठेवणे, खेळणी काढून देणे, तिचे उद्योग खेळ मजेत बघत बसणे, तिला बागेत फिरायला घेऊन जाणे आणि तिला झोप आली कि दुपारी तिला खांद्यावर घेऊन फिरणे, संध्याकाळी पुन्हा इमारतीच्या आवारात तिला घेऊन फेर फटका मारणे असेच असे. आयुष्यात शंतनू ला एवढा वेळ कधीच देता आला नव्हता. आता त्याच्या मुलीकरता वेळ द्यायला मिळाल्यामुळे एक विलक्षण समाधान मला मिळून गेले.

दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी जेंव्हा मी डॉक्टरांकडे तपासणी साठी गेलो असता, माझे "क्रिएटिन" वाढू लागलेले आढळले. डॉक्टर ऋषी नी मला स्पष्ट कल्पना दिली कि "आता लवकरात लवकर आपल्याला "फिस्तुला" शस्त्रक्रिया करून ठेवणे आवश्यक आहे. जर काही कारणामुळे सर्दी, ताप, खोकला किंवा अन्य साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव झाला आणि "क्रिएटिन" प्रमाणाबाहेर वाढत गेले तर तातडीने "डायलेसिस" उपचार करणे अत्यावश्यक ठरेल. "फिस्तुला" शस्त्रक्रियेनंतर देखील ४५ दिवस जावे लागतात. आता एक दोन आठवड्यात जसलोक मध्ये भरती हो”

डॉक्टरांच्या औषधामुळे "क्रिएटिन" व्यतिरिक्त माझ्या प्रकृतीची इतर काहीच तक्रार नव्हती आणि अजिबात अशक्तपणा नव्हता. मी सगळे व्यवहार, श्रीमयी ला सांभाळणे व्यवस्थित करत होतो. दरम्यान सौ. विजयाने तिच्या कार्यालयात, “कामगार राज्य विमा महामंडळाकडे" ३१ मार्च २०२० रोजी सेवेतून स्व-खुशीने सेवा मुक्त करावे म्हणून विनंती अर्ज केला होता. सहाजिकच नंतर श्रीमयी ची दिवसा संभाळण्याची माझ्यावरील जबाबदारी खूपच कमी होणार होती. त्यामुळे आणि घरातील काही तातडीच्या कामामुळे मी जसलोक मध्ये जाऊन "फिस्तुला" शस्त्रक्रिया करून घेण्याचे "एप्रिल २०२०" पर्यंत पुढे ढकलले.

....आणि आणि....२१ मार्च २०२० पासून भारतात "कोरोना" चा काळाकुट्ट कालखंड सुरु झाला. मग तर सर्वाना माहितीच आहे. सगळे व्यवहार बंद, काम बंद, रुग्णालये आणि डॉक्टरांवरील ताण मात्र प्रचंड वाढलेला. घरोघरी लोक आजारी पडू लागले होते. अनेक जण हे जग सोडून जाऊ लागले. कुठल्या गोष्टीमुळे "कोरोना" रोग होतो हे जागतिक संघटना आणि आपल्या आरोग्य संघटना जसजसा त्यांना शोध लागेल तसतसे सांगत. सगळीकडे हतबलता आली. औषध कोणते माहित नाही, काय उपचार होतात हे सांगता येत नाही.

आता अशा कालखंडात जसलोक मध्ये जाऊन "शस्त्रक्रियेसाठी" जाणार तरी कसे. कारण सगळीच रुग्णालये "कोरोना" रुग्णांना सेवा देण्यात तत्परतेने झटू लागली होती. त्यामध्ये आपण जाऊन त्यांचे काम आणि ताण वाढवायचा आणि पुन्हा आपल्यालाही "कोरोना" ची बाधा झाली म्हणजे मग वेगळ्याच वाटेने प्रवास सुरु व्हायचा ही मनात सर्वांच्याच भीती. त्यामुळे केवळ डॉक्टर ऋषी च्या संपर्कांत राहून, नियमित औषध पथ्य सुरु ठेवले आणि त्याला शरीराने देखील चांगला प्रतिसाद जवळजवळ फेब्रुवारी, २० २१ पर्यंत दिला.

उपचार पद्धती - प्रत्यारोपणाचा अवघड निर्णय

काहीतरी निमित्त झाले आणि आणि...फेब्रुवारी, २०२१ पासून माझे क्रिएटिन एकाएकी वाढू लागले. माझ्या कुटुंबातील आई, धाकटा भाऊ सुनील आणि माझी ताई - प्रतिभा प्रमोद भिडे याना "पॉली सिस्टिक किडनी" आजाराने देवाघरी पाठविल्यावर आता तोच "पॉली सिस्टिक किडनी रोगाचा वाघ" माझी शिकार करण्याच्या उद्देशाने माझ्या रोखाने येऊ लागला होता.

माझ्या रक्तातील क्रिएटिन आणि संबधीत घटकांचे प्रमाण वेगाने वाढू लागले. डॉ देशपांडे यांनी ताबडतोब तपासणी करून "साठे, आता आपल्याला काही महिन्यात डायलिसिस उपचार तातडीने करावे लागले तर त्या आधीची छोटीशी शस्त्रक्रिया हातावर करणे तातडीचे ठरले आहे. तेंव्हा मी सांगेन त्यावेळेस जसलोक मध्ये माझ्या देखरेखीखाली खाली भरती हो".

गेल्या वर्षीच (फेब्रुवारी,२०२०) सांगितलेली "फिस्तुला" शस्त्रक्रिया, "कोरोना" आणि अन्य काही कारणाने आणि शरीराने दिलेल्या सहकार्यामुळे पुढे ढकललेली, २६ मार्च, २०२१ रोजी करण्याचे ठरवून मी जसलोक मध्ये भरती झालो. २६ मार्च २०२१ रोजी ती शस्त्रक्रिया करून घेतली.

१५ एप्रिल, २०२१ रोजी माझ्या पोटात जिथे किडनीने आपले साम्राज्य पसरवले होते तिथे खूप वेदना होऊ लागल्या. हा प्रकार एकदमच वेगळा होता. आज पर्यंत माझ्या किडनी मध्ये किंवा पोटात कधीच कुठे दुखले नव्हते. डॉक्टरांच्या सांगण्यानुसार ताबडतोब "सोनोग्राफी" करून घेतली. डॉक्टर ऋषींचा अंदाज एकदम खरा ठरला होता. माझ्या किडनी मधील सिस्ट ने उग्र रूप धारण करून त्यातून रक्तस्त्राव झाला होता. तो रिपोर्ट घेऊन मी जेंव्हा डॉक्टरकडे

गेलो तेंव्हा डॉक्टर म्हणाले:

"रक्तस्त्राव" झाला तर अशा किडनी ला आम्ही अजिबात हात लावत नाही. यावर औषध देखील आता नको. "रक्तस्त्राव" आता आपोआप थांबून जाईल आणि वेदना सुद्धा परत लगेच होणार नाहीत. पण जर "डायलेसिस" करायची वेळ आलीच आणि ते करताना पुन्हा "रक्तस्त्राव" सुरु झाला तर अशावेळी आम्हाला तातडीने "किडनी" काढूनच टाकावी लागते"

त्यांनी सांगितलेली माहिती धक्कादायक होती परंतु डॉक्टर ऋषी मुळे आम्हाला कोणालाच ताण जाणवला नाही.

प्रत्येक भेटीत डॉ. साहेबांनी मला, माझ्या मुलाला - शंतनू ला, विजया ला आणि विजयाच्या दोन्ही सख्ख्या बंधूना श्री. रघुराज कुलकर्णी आणि श्री. भरत राज कुलकर्णी यांना - "तुम्ही सर्वांनी डायलिसिस उपचारा व्यक्तिरिक्त मूत्र पिंड प्रत्यारोपणाचा विचार करावा" असे सोप्या स्पष्ट शब्दात सांगितले. "फिस्तुला" साठी आणि नियमित तपासणीसाठी जसलोक मध्ये भरती असताना, डॉक्टर ऋषी देशपांडे मला तपासताना अगदी सहज असे मौलिक विचार बोलून दाखवायचे आणि तितक्याच सहजतेने दुसऱ्या रुग्णाकडे विचारपूस करायला झटकन निघून जायचे. वेळोवेळी त्यांनी मला :

- साठे, साठ - बासष्ट वर्षे जगून झाली आता कशाला आणखी आयुष्य असे ठरविणे योग्य नाही
- देवाने आपल्याला दोन मूत्रपिंड दिली आहेत त्यातील एक दान देण्यासाठी असते असे नाही. परंतु वैद्यकीय क्षेत्रात आता इतकी प्रगती आहे कि आपण त्याचा फायदा घेऊन गरजूंचे आयुष्य चांगले करण्याचा प्रयत्न नक्कीच करू शकतो. दान करणाऱ्याला काहीच त्रास होत नाही आणि त्याला कायमची औषधे कधीच लागत नाहीत.
- मूत्रपिंड प्रत्यारोपण हे नशिबात असावे लागते. अनेक रुग्णांची ठरवून सुद्धा शस्त्रक्रिया घडून येत नाही.

- अनेक दृष्टीने तुमची प्रकृती प्रत्यारोपणासाठी खूप चांगली आहे.
- तुमच्या कुटुंबातील ज्याची किडनी काढणार त्याला त्रास होणार असेल तर अशा गोष्टीचा आपण विचार देखील करणार नाही.

इतक्या आत्मीयतेने सांगितल्यावर माझे त्यावर आपोआप चिंतन सुरु झाले. मनोमन मी प्रत्यारोपणाचा विचार का करू नये अशा मनस्थितीत पोहोचलो.

आणखी काही सुंदर विश्लेषणात्मतक वाक्ये डॉक्टर ऋषी यांनी आमच्या एका बैठक चर्चेमध्ये सांगितली ज्यावेळी शंतनू, विजया, विजयाचे दोन्ही भाऊ, आणि अर्थातच मी हजर होतो:

कुठल्याही माणसाच्या कार्यक्षमता आणि जीवनात आनंद घेण्याचा आलेख काढला तर त्याचा क्रम खालील प्रमाणे असेल:

- निरोगी व्यक्ती-त्याची कार्यक्षमता, प्रवास करणे, आवडेल त्या क्षेत्रात काम करणे ... (१)
- पॉलिसिस्टिक किडनी आजार शरीरात आहे - कार्यक्षमता, प्रवास करणे, आवडेल ते काम करू शकणे-जे तुमच्या बाबतीत डिसेंबर २०२० पर्यंत सुरु राहिले, शरीरावर मनावर परिणाम झाला नव्हता... (२)
- पॉलिसिस्टिक किडनी आजार शरीरात आहे - मूत्र पिंड प्रत्यारोपण यशस्वी झाले पहिले तीन महिने काळजी घेतली कि कार्यक्षमता, प्रवास करणे, आवडणारे काम / छंदासाठी वेळ मिळणे, आनंद आणि समाधान मिळविणे काही थोडी पथ्ये तंतोतंत पाळली तर सहज शक्य असते... (३)
- पॉलिसिस्टिक किडनी आजार शरीरात आहे - व्यक्ती डायलेसीस उपचार घेत असल्यास सतत साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होण्याची भीती, आठवड्यातून दोन किंवा तीन दिवस डायलेसीस सुरु असल्याने एका आठवड्यात १२ ते १५ तास डायलेसीस केंद्रात जाणे येणे, अधिक

सोबतीच्या व्यक्तीचे तेव्हढेच तास खर्ची, आणि सतत बदलणारी औषधे, तपासणीचा वेळ... सर्वच विचार करता प्रवास अशक्य... कार्यक्षमतेवर मर्यादा...कंटाळवाणा उपचार...मनात निराशा येणे... वरचेवर शरीर कमकुवत होत जाणे ... (४)

गेल्या वर्षातील घटनाक्रम आठवून आणि रक्तस्त्राव झाल्यानंतर पुढे आलेली माहिती यावर आम्ही विचार करू लागलो. किडनी आज ना उद्या काढावी लागणारच आहे तर डॉक्टर म्हणाल्याप्रमाणे ५०% काम हे करावेच लागणार आहे. केवळ डायलेसिस उपचारांनी ह्या गोष्टी थांबणाऱ्या नाहीत. त्या ऐवजी डॉक्टर सांगताहेत त्या प्रमाणे एकाच वेळी किडनी काढून टाकून प्रत्यारोपण करणे हे कमी त्रासाचे नक्कीच ठरेल.

"नियतीनेच" हा घटना क्रम घडवून आणला आणि ही "साद दैवाचीच" आहे की काय ? असे ही मनात राहून राहून येऊ लागले.

आम्ही सर्वांनी एकत्रित विचार केला आणि प्रत्यारोपणाचा निर्णय पक्का कसा होईल याच्या तयारीस लागलो. विजयाची, मुलाची आणि माझ्या धाकट्या भावाची वैद्यकीय तपासणी केल्यावर डॉ देशपांडे यांनी विजया मूत्र पिंड दान चांगल्या रीतीने करू शकेल याची आम्हाला कल्पना दिली. आणखी आवश्यक त्या विजयाच्या माझ्या वैद्यकीय चाचण्या झाल्या, निर्णय पक्का झाला आणि कायदेशीर प्रतिज्ञा पत्रे, अनेक प्रमाणपत्रे, पोलीस व्हेरिफिकेशन , आयकर प्रमाण पत्रे हे सारे शंतनू, आणि विजयाचे दोन्ही भाऊ यांच्या कार्यलयातील कामाचे तास, ताण, सुट्ट्यांची तडजोड, प्रचंड इच्छाशक्ती, भरपूर उत्साह, आवश्यक आणि आरामदायी वाहतूक व्यवस्था करून झपाट्याने पूर्ण केली. शंतनू च्या सौ नंदा मामींनी त्यांच्या मावसभावाला श्री.पारेकर गुरुजी, डोंबिवली यांना शस्त्रक्रियेची तारीख काय असावी अशी विचारणा केली. त्यांनी देखील त्यांचा व्याप सांभाळून २७ जुलै तारीख हे शुभ असल्याचे कळविले. विजयाने सुद्धा आमचे वकील मित्र श्री.रणदिवे यांच्या मुळे आमच्या परिचयाच्या झालेल्या आणि स्वतः चार्टर्ड अकाउंटंट असून आता केवळ छंद

जोपासण्यासाठी म्हणून ज्योतिष शास्त्राचा अभ्यास करणाऱ्या श्री.मोझेस पती पत्नीची मदत घेऊन प्रत्यारोपण साठी चा शुभ दिवस २७ जुलै २०२१ चांगला आहे असे सांगितले. श्री. पारेकर गुरुजी आणि सौ.मोझेस यांची तारीख एकच आल्याने डॉक्टर देशपांडे यांना २७ जुलै तारीख कळविली.

ज्यावेळेस विजया मूत्रपिंड दान करणार हे पक्के ठरले त्या क्षणी माझी वहिनी सौ. आरती दीपक रानडे आणि माझ्या जेष्ठ सहकारी वकील सौ. वृंदाताई किशोर रणदिवे यांनी विलक्षण भावना व्यक्त केल्या आणि म्हणाल्या:

"विजया तू आधुनिक सावित्री आहेस".

माझ्या रूपाने आमच्या कुटुंबातील चौथा बळी आजाराने निश्चित केला होता. पण पण... डॉ ऋषी देशपांडे यांच्या मुळे आणि विजयाच्या मला "मूत्रपिंड दान करण्याच्या खंबीर इच्छाशक्तीने" मी या वाघाला काही वर्षे आता सशक्त हातानी थोपवून धरू शकणार होतो.

पूर्व तयारी - शारीरिक आणि मानसिक

शस्त्रक्रियेची तारीख पक्की झाल्यावर डॉक्टरांनी वैद्यकीय चाचण्यांची यादी आम्हाला दिली आणि तिकडे रुग्णालयाच्या दृष्टीने आवश्यक तयारी सुरु केली.

आम्ही सगळे शस्त्रक्रियेसाठी काय तयारी लागेल, खर्चाचा अंदाज घेऊन प्रतिज्ञा पत्र तयार करणे, लागणारी कागद पत्रे जमविणे, फोटो काढणे आणि जसे सांगतील त्या त्या वैद्यकीय तपासण्या करून घेणे इत्यादी गोष्टी वेगाने करू लागलो.

डॉक्टरांनी ऋषी यांनी लगेच दोन दिवसांनी मला, विजयाला, शंतनूला जसलोक ला बैठकीसाठी वेळ पक्की करून बोलावून घेतले. विजयाने अगदी आम्ही ठाण्याहून निघताना तिच्या लहान भावाला “तू आज सुट्टी घेऊन थेट जसलोक रुग्णालयात येऊ शकशील काय?”. क्षणाचाही विलंब न लावता संजू मामा म्हणाला "बरे झाले मला ड्युटी वर निघायला आज थोडा उशीर झाला. मी आता ऑफिस ला कळवितो आणि सुट्टी टाकतो आणि अँटॉपहील येथे माझ्या घराखाली एक तासांनी येऊन राहतो. आम्ही जसलोक ला जाताना वाटेत त्याला बरोबर घेतले आणि जसलोक मध्ये डॉक्टर ऋषींच्या वैयक्तिक कक्षात जाऊन बसलो.

डॉक्टर आले आणि त्यांनी सुरवातीसच स्पष्ट केले कि आज आता चर्चा असणार नाही तर "मूत्रपिंड प्रत्यारोपण प्रक्रियेसाठी" आवश्यक त्या कायदेशीर बाबींची सुरवात होणार आहे. मी तुम्हा सर्वाना या प्रक्रियेतील धोके काय आणि कसे असतात याची माहिती देतो. काळजी काय आणि किती काळ अतिशय सतर्क राहून घ्यावी लागते. नंतर देखील काही औषधे हि दररोज घ्यावीच लागतात

आणि त्यामध्ये जराही खंड पडून चालत नाही. दुसऱ्या माणसाची किडनी हा परदेशी अवयव असल्याने तुमचे शरीर ते नाकारू शकते आणि तो फार मोठा धोका असतो. त्याकरिता तुमची प्रतिकार शक्ती आम्हाला कमी करावी लागते आणि मग जराही सर्दी, खोकला, ताप, साथीचे रोग होऊ न देणे आणि त्याकरिता जराही बदल शरीरात जाणवला कि लगेच नेफ्रा टीम च्या डॉक्टर्स कडे येऊन तपासणी, औषधात बदल वेळ न घालवीता करणे आवश्यक असते. तुमच्या डाव्या मूत्रपिंडाचा आकार २३ सेंटीमीटर झाल्याने ही फार मोठी शस्त्रक्रिया असणार आहे. इतके सांगून त्यांनी "ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेटर "जसलोक" याना बोलावून घेतले. ते म्हणाले आता मी तुमची सगळ्यांची नावे परत पुकारून कोण किडनी देणार आहे, कोण किडनी स्वीकारणार आहे, तुमच्या दोघांच्या वतीने कोण साक्षिदार असणार आहेत ते सांगून वरील माहिती तुम्हाला नीट समजली आहे ना अशी खात्री करून घेणार आहे. या आपल्या संभाषणाचे विडिओ शूटिंग श्री.निलेश आता सुरु करेल. हे विडिओ शूटिंग तुमच्या कागदपत्रांच्या सोबत राहते. यानंतर तुमची चौघांची एक मीटिंग डॉक्टर रावल जे किडनी स्वीकारणाऱ्याची किडनी काढून त्या रिकाम्या जागेत दुसरी किडनी बसविणार आणि डॉक्टर लालमलानी जे किडनी दात्यांची किडनी काढणार यांच्याबरोबर आजच आपण करू ज्याचे देखील विडिओ शूटिंग होऊन ही दोन्ही शूटिंग तुमच्या कागदपत्रांच्या सोबत कायमची असणार आहेत. शेवटची मीटिंग होईल ज्यामध्ये तुमची प्रत्येकाची एकेकट्याची स्वतंत्र मुलाखत ४ सरकारी डॉक्टर्स घेतील आणि आम्ही सर्व डॉक्टरांनी ट्रान्सप्लांट मधील सगळे धोके, माहिती तुम्हा प्रत्येकाला सांगितली आहे ना हे तपासून पाहतील. ते सर्व डॉक्टर्स किडनी देणारा स्वखुशीने, स्वतःच्या मर्जीने आणि कुठल्याही प्रकारच्या दबावामुळे किंवा पैसे घेऊन स्वतःची किडनी विकत नाही ना याची खात्री करून घेतील. त्या सर्व संभाषणाचे देखील विडिओ शूटिंग होईल आणि सगळी कागदपत्रांची छाननी करून ते सर्व डॉक्टर्स जसलोक रुग्णालयाला "मूत्रपिंड प्रत्यारोपण' करण्याची परवानगी देतील. त्या मीटिंग मध्ये जसलोक मधील आम्ही कोणीही असणार नाही.

एवढ्या संभाषणानंतर डॉक्टर ऋषी देशपांडे यांच्या बरोबरच्या मीटिंग चा वृत्तांत श्री.निलेश यांनी विडिओ रेकॉर्ड केला.

त्यानंतर लगेच ४ वाजता डॉक्टर रावल आणि डॉक्टर लालमलानी यांच्या सोबत च्या मीटिंग चा वृत्तांत देखील श्री.निलेश यांनी विडिओ रेकॉर्डिंग केला. डॉक्टर रावल आणि डॉक्टर लालमलानी यांनी शस्त्रक्रियेतील धोके समजावून सांगितले. १००० त एखादी शस्त्रक्रिया अयशस्वी ठरू शकते. परंतु रुग्णांनी ती शक्यता लक्षात ठेवणे आवश्यक आहे. बोलता बोलता डॉक्टर रावल म्हणाले "साठे, शस्त्रक्रियेदरम्यान अशा काही अडचणी प्रकृतीच्या येऊ शकतात कि रुग्ण शस्त्रक्रिया टेबल वर सुद्धा जीव गमावू शकतो".

डॉक्टर रावल आणि डॉक्टर लालमलानी यांच्या बरोबरची मीटिंग संपली.

श्री.निलेश सोरटे

कागदपत्रे, प्रतिज्ञा पत्रे, वैद्यकीय चाचण्या, डॉक्टरांबरोबर बैठका – प्रत्यारोपण परवानगी :

डॉक्टर रावल आणि डॉक्टर लालमलानी यांच्याकडील बैठक संपताच श्री.निलेश सोरटे, जसलोक ट्रान्सप्लांट कोओर्डीनेटर, यांनी आम्हाला कागदपत्रे, प्रतिज्ञापत्रे, प्रमाणपत्रे, फोटो, पोलीस वेरिफिकेशन इत्यादींची पुढे नमूद केल्याप्रमाणे भली मोठी यादी दिली आणि सर्व कागदपत्रे लवकरात लवकर तयार करा आणि मला कळवा असे बजावले. थोडे थांबून श्री.निलेश सोरटे म्हणाले कि तुम्हाला मी प्रत्यारोपण किती प्रकारे होते हे थोडक्यात सांगतो. त्यांनी खालील प्रमाणे "हृदय, फुफुसे, आतडे, मूत्रपिंड" इत्यादी अवयवांचे प्रत्यारोपणाचे प्रकार खूप छान पद्धतीने समजावून सांगितले.

Live Related Transplantation : direct relation i. e. Donor is from immediate family members : Wife, husband, son, daughter, mother, father, brother, Sister

Live Unrelated Transplantation: distant relatives i. e. Donor is from relatives: Paternal Uncle/Aunt, Maternal Uncle/Aunt, Father-in-law, Mother-in-law, Brother-in-law, Sister-in-Law, Nephew, Niece, etc.

Swap Transplantation: From "X" family the Recipient's Blood Group is "A" and from the same family the "Donor"'s Blood Group is "B" and from "Y" family the Recipient's Blood Group is "B" and from the same family the "Donor"'s Blood Group is "A" in which case permission for transplantation would be given based on the following combination:

Recipient from "X" family = Donor from "Y" family.
Recipient from "Y" family = Donor from "X" family.

Cadaver Transplantation: Heart, Lungs, Liver, Kidney, Pancreas, Cornea and Skin removed from someone who has died and concerned Doctors, after series of tests have established that the person (now donor) is brain dead and the concerned family members, relatives have consented in writing in front of the competent authority for the donation of the organ.
There is a Zonal Transplant Co-ordination Centre (Govt. body) which maintains the list of brain dead persons. There is a Committee of Doctors/Members for the purpose.

The hospitals (Concerned Doctors / Nephrologist / Transplant Coordinators from the hospitals) which has the permission and authority to perform such Cadaver Transplantation coordinates with Zonal Transplant Co-ordination Centre, keeps on exchanging their requirement of donor for the recipient they are treating, establishes the suitability of transplantation of the organ of the brain dead person (donor).

वरील प्रमाणे प्रत्यारोपणाचे प्रकार थोडक्यात सांगून झाल्यावर श्री.निलेश सोरटे म्हणाले कि तुमच्या बाबतीत हे प्रत्यारोपण पहिल्या म्हणजे "लाईव्ह रिलेटेड ट्रान्सप्लांटेशन" या प्रकारात होईल. अशा प्रत्यारोपणाची परवानगी मिळण्याकरिता जी कागदपत्रे, पुरावे आणि विविध प्रकारच्या वैद्यकीय चाचण्यांचे रिपोर्ट लागतात त्याची यादी पुढील प्रमाणे आहे. सदरहू सगळी कागदपत्रे, पुरावे, वैद्यकीय चाचण्यांचे रिपोर्ट्स च्या चार प्रति काढून अशा चार वेगवेगळ्या फाइल तयार झाल्या कि मला कळवा म्हणजे मी संबंधित डॉक्टरांच्या समितीशी बोलून बैठकीची तारीख, वेळ आणि ठिकाण यांचे नियोजन लवकरात लवकर करू शकेन.

संपूर्ण प्रत्यारोपणाच्या प्रक्रियेत श्री.निलेश सोरटे यांची आम्हाला खूप छान मदत झाली. श्री.निलेश सोरटे यांनी आम्हाला कागदपत्रे, पुरावे आणि वैद्यकीय चाचण्यांच्या चार वेगवेगळ्या फाइल तयार करण्यासाठी दिलेली यादी.

No	Documents in order
1.	Documents verification list
2.	Information of recipients and donor
3.	Approval letter by committee
4.	Certification by MD of the hospital that the Operating Surgeons are qualified as per the qualifications given in THOA 1994
5.	Treating Nephrologist's Gastroemerology Hepatology certificate stating recipient's diagnosis and recommendation for organ transplant
6.	Psychiatric fitness evaluation report of Donor
7.	Form No. 1 (related)
8.	Form No. 2 (spouse)

9.	Form No. 3 (unrelated)
10.	Form No. 4
11.	Form No. 5
12.	Form no. 11 (Joint application)
13.	(HLA, Cross match, H. L. A Typing) reports of donor and recipient
14.	Blood group report & HHH reports of both (recipient and donor)
15.	Police verification report of recipient and donor : link for police vertification = https://pcs. mahaonline. gov. in/Forms/Home. aspx Step 1 : Registration Step 2 : Login Step 3 : Fill application Step 4 : Pay fees Step 5 : Verification by local police station Step 6 : Verification by CFC
16.	Documents of Recipients: Aadhaar card (original + self attested copies – 6) Leaving Certificate Birth Certificate Ration card Voters' Card PAN Card (original + self attested copies – 6) Marriage Certificate Pass port of recipient (Aadhaar, PAN, Marriage – Mandatory Birth or School

	Leaving Certificate, Voter's Card or Ration Card) Pass Port not mandatory, but will be useful) IT Returns of last 3 Financial Years– mandatory Passport size photos (40 copies)
17.	Documents of Next kin of Recipients: Aadhaar card (original + self attested copies – 6) School Leaving Certificate Birth Certificate Ration card Voters' Card Electricity bill – latest PAN Card (original + self attested copies – 6) Marriage Certificate Pass port (Aadhaar, PAN, Marriage – Mandatory Birth or Leaving, Voters' card or Ration) Pass Port not mandatory, but will be useful) Passport size photos (30 copies) Documents in order
18.	Documents of Recipients: Aadhaar card (original + self attested copies – 6) School Leaving Certificate Birth Certificate Ration card Voters' Card

	PAN Card (original + self attested copies – 6) Marriage Certificate Pass port of recipient (Aadhaar, PAN, Marriage – Mandatory Birth or Leaving, Voting or Ration) Pass Port not mandatory, but will be useful) IT returns of last 3 Financial Years – mandatory Passport size photos (40 copies)
19.	Documents of Next Kin of Donor: Aadhaar card (original + self attested copies – 6) School Leaving Certificate Birth Certificate Ration card Voters' Card Electricity bill – latest PAN Card (original + self attested copies – 6) Marriage Certificate Pass port (Aadhaar, PAN, Marriage – Mandatory Birth or Leaving, Voters' card or Ration) Pass Port not mandatory, but will be useful) Passport size photos (30 copies) Documents in Order

20.	Affidavits of Recipient
21.	Affidavits of next to kin of Recipient
22.	Affidavits of Donor
23.	Affidavits of next to kin of donor
24.	Family Tree of (Recipient and Donor)
25.	Family photo (old and new or latest)
26.	Income declaration (Recipient and Donor) 3 Financial Year IT return
27.	Hospital human organ transplant centre registration / renewal certificate from concerned DHS

Items at Sr. Nos. 1 to 5 : to be kept ready by concerned hospital / doctor / transplant co-ordinator of the hospital.

Sr. No. 6 – Donor and recipient should take appointment of Psychiatrist available at the concerned hospital, consult Psychiatrist and after consultation, the Psychiatrist will send report directly to the hospital / transplant co-ordinator / social co-ordinator

Sr. Nos. 7 to 12 : Concerned Hospital will arrange

Sr. Nos. 13 and 14: Concerned Nephrologist will guide recipient and donor for conducting the tests

Sr. Nos. 15 to 19 : Recipient, donor and next kin to recipient and donor needs to keep these documents and copies / photos etc. ready

Sr. Nos. 20 to 25 : Advocate needs to prepare these documents and get them notarised all the other documents / information of recipient,

Donor as well as next of kin to recipient and donor.

Advocate Pravin K Gupta, helped us in preparing all the affidavits and required forms / documents.

Sr. No. 26 – to be organised by recipient and donor

Sr. No. 27 – to be arranged by concerned hospital.

वरील यादी प्रमाणे आम्ही कागद पत्रांची तयारी सुरु केली. पोलीस व्हेरिफिकेशनच्या लिंक वर जाऊन अर्ज, आवश्यक ते शुल्क आणि साईट वर जी कागद पत्रे टाकायला सांगितली होती ती सगळी माहिती आणि कागदपत्रांच्या प्रति जोडल्या. आमचा अर्ज संबधित पोलीस स्थानकात गेला. तिथून तो अर्ज आणि माहिती पोलीस कमिशनर च्या कार्यालयाकडे जाऊन आवश्यक ती छाननी होऊन पुन्हा संबंधित पोलीस स्थानकात आला. एक आठवडा वाट पाहून राजू मामा यांनी त्यांच्या खात्यातून पोलीस स्थानकात फोन केला. त्याच दिवशी संध्याकाळी राजू मामा सह मी आणि विजया त्या पोलीस स्थानकात गेलो. आम्हाला लगेच आमचे वेरिफिकेशन झाले असल्याचे सांगितले. आम्ही घरी येऊन त्या प्रमाण पत्राच्या प्रति प्रिंट केल्या.

श्री. निलेश यांनी सांगितलेल्या वकिलांकडे जाऊन सगळी कागद पत्रे देऊन आवश्यक ती प्रतिज्ञा पत्रे पूर्ण केली.

डॉक्टर ऋषींनी वेळोवेळी सांगितलेल्या वैद्यकीय रक्त तपासण्या करून घेतल्या (एच ल ए, क्रॉस मॅच, सोनोग्राफी इत्यादी सांगितलेल्या चाचण्या तीस दिवसात पूर्ण होऊन त्याचे रिपोर्ट्स डॉक्टरकडे नेवून दिले.

वैद्यकीय चाचण्यांचे रिपोर्ट (T & B सेल क्रॉस मॅच; HLA, DNA इत्यादी) पाहून डॉक्टर ऋषी देशपांडे आणि डॉक्टर रावल खूपच खुश होत म्हणाले "पती पत्नी" मध्ये इतकी छान टक्केवारी आणि एकमेकाला पूरक असे रक्तातील /

शरीरातील घटक जुळत नाहीत". ह्या शस्त्रक्रियेसाठी ही फार चांगली गोष्ट आहे.

आम्ही देखील हे ऐकून खूप सुखावलो. नकळत माझे आणि सौ.विजयाचे हात देवाला जोडले गेले. दैवाने आणि देवाने आम्हाला सगळ्याच बाबतीत भक्कम पाठिंबा द्यायचे ठरवलेले दिसत होते.

डॉक्टर ऋषी देशपांडे पुढे म्हणाले: आता ह्या सर्व कागदपत्रांची, रिपोर्ट्स ची तपासणी आणि तुमच्या प्रत्येकाबरोबर वेगवेगळी "मुलाखत" जसलोक मध्ये दिनांक १३ जुलै २०२१ सकाळी ११.०० वाजता ठरली आहे. ह्या "मुलाखतीच्या" वेळी जसलोक मधील आम्ही कोणीही डॉक्टर्स असणार नाही. आय एम ए, दिल्ली वरून दोन डॉक्टर्स आणि महाराष्ट्र सरकारमधील दोन डॉक्टर्स प्रतिनिधी असे एकूण चार मोठे डॉक्टर्स पदाधिकारी तुम्हाला प्रत्येकाला वेगवेगळे प्रश्न विचारातील आणि तुमच्याकडून तुम्हाला ह्या शस्त्रक्रियेत असलेले धोके, नंतर रुग्णाची देखभाल आणि औषोधोपचार, तसेच किडनी दात्याने स्व खुशीने किडनी द्यायचे ठरविले आहे ना, हे सर्व ताडून पाहतील. कागदपत्रांची आणि प्रमाणपत्रांची सत्यता पाहतील आणि त्यांना योग्य वाटले तरच जसलोक ला ही "शस्त्रक्रिया करून प्रत्यारोपण प्रक्रिया" पूर्ण करण्याची परवानगी देतील.

ठरल्याप्रमाणे दिनांक १३ जुलै २०२१ रोजी "मुलाखती" पार पडल्या. मुलाखतीनंतर १० - १५ मिनिटांचा फक्त अवधी गेला असेल, तोच आम्हाला चौघांना (मी, विजया, शंतनू, आणि संजू मामा) त्या सर्व डॉक्टर्सनी आत बोलावले आणि "प्रत्यारोपण शस्त्रक्रियेला" दिनांक २७ जुलै २०२१ रोजी परवानगी मंजूर केल्याचे शुभेच्छा देऊन सांगून टाकले आणि तशी नोंद आमच्या सगळ्या कागदपत्रावर करून स्वाक्षऱ्या करून टाकल्या.

कागदपत्रे जमविणे, वैद्यकीय चाचण्या साठी हजर राहणे, चाचण्यांचे रिपोर्ट्स

डॉक्टर्स कडे नेवून देणे, मुलाखती साठी जसलोक मध्ये वेळेवर पोहोचणे यासाठी मी, विजया, शंतनू, राजू आणि संजू मामा आणि निलेश या सर्वांनी गेले तीन महिने केलेली पळापळ सत्कारणी लागली आणि "शस्त्रक्रियेच्या" तारखेकडे आमचे लक्ष लागले.

प्रत्यारोपण शस्त्रक्रिया - प्रत्यक्ष अनुभव

शस्त्रक्रियेची तारीख २७ जुलै, २०२१ पक्की ठरली. डॉक्टर ऋषी यांनी माझ्या आणि सौ. विजयाच्या रक्तातील पूरक घटक पाहून मला सांगितले कि "प्लास्मा उपचार" सात ऐवजी केवळ दोनच "सायकल" लागतील आणि म्हणून मला त्यांनी २५ जुलै २०२१ रोजी सकाळी ७.३० वाजता जसलोक मध्ये दाखल हो म्हणून सांगितले. त्याप्रमाणे मी २५ जुलै २०२१ रोजी आणि सौ. विजया दिनांक २६ जुलै, २०२१ सकाळीच जसलोक मध्ये दाखल झालो.

२७ जुलै २०२१ रोजी सकाळी आठ वाजता मला आणि विजयला शस्त्रक्रियेसाठी नेण्यात आले. आदल्या दिवशी रात्री - दिनांक २६ जुलै, २१ - रात्री ८.०० वाजल्यापासून आम्हाला पाणी देखील देण्यात आले नव्हते.

शस्त्रक्रियेच्या टेबल वर डॉक्टर रावल आणि डॉक्टर लालमलानी यांनी आम्हाला दोघांना "तुमचे नाव काय ?" म्हणून विचारले". दुसरा प्रश्न त्यांनी विचारला "तुम्ही इथे कशासाठी आला आहेत. कसे बसे आम्ही सांगितले "किडनी ट्रान्सप्लांट" .....पुढचे काही आम्हाला दोघांना आठवत नाही. जेंव्हा जाग आली तेंव्हा मी वेगळ्याच खोलीमध्ये "विलगीकरण (आयसोलेशन) कक्षात होतो १०व्या मजल्यावर होतो. विजया बद्दल मी विचारले, तर सिस्टर म्हणाल्या त्यांना बायकांच्या वॉर्ड मध्ये १४ व्या मजल्यावर ठेवले होते.

मला उठता येत नव्हते. शस्त्रक्रिया झालेल्या भागात खूप वेदना होत होत्या. पाठ तर प्रचंड दुखत होती आणि मान देखील दुखायला लागली होती. मानेत, नाकात, दोन्ही बाजूला कंबरेत नळ्याच नळ्या लावलेल्या होत्या. मला नळीतून औषधें आणि सलाईन सुरूच होते. थोडीशी ग्लानी मध्ये येत होती. झोपेचे

औषध चालू असल्याने मला परत झोप लागली.

२९ जुलै २१ ला दुपारी मला परत जाग आली. शस्त्रक्रियेच्या वेदना कमी झाल्या होती. परंतु मान आणि पाठ तर प्रचंड दुखू लागली होती. अक्षरशः कळा सहन होईनात. मी सिस्टर ला सांगून डॉक्टर रजिता आणि डॉक्टर अश्विन याना पाठ दुखी करता काही तरी करायला सांगितले. तेवढ्यात डॉक्टर ऋषी देखील माझ्याकडे तपासायला आले. त्यांनी ऐकले मात्र - माझी पाठ भयंकर दुखते आहे. त्यांची लगेच डॉक्टर अश्विन याना "औषधी पट्टी" लावायला सांगितले. एक छोटीशी पट्टी आणून सिस्टर ने माझ्या खांद्याला चिकटवली. मला थोडे आश्चर्यच वाटले. एवढ्याश्या पट्टीने सगळी पाठदुखी कशी काय थांबणार.

मान देखील दुखत होती आणि मला एकदम डॉक्टर प्रशांत सोनवतीकर, औरंगाबाद यांचा "तो " किस्सा प्रकर्षाने आठवला.

आम्ही विरार येथे राहत असताना माझी मान प्रचंड दुखायला लागली. त्याच सुमारास ऑफिस मध्ये कॉम्पुटर वर काम करताना पुढे वाकून काम करायची सवय लागली होती आणि ते मला जाणवत होते. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मी क्स-रे काढला. त्याच सुमारास सौ.विजयाचा औरंगाबाद येथील चुलत भाऊ डॉक्टर प्रशांत सोनवतीकर हे स्वतःचे "सोनोग्राफी" केंद्र चालवीत. आम्ही त्यांना विचारून एक्स-रे त्यांच्याकडे पाठविला. त्यांनी नीट पाहणी करून "सुभाष, तुम्ही योगासने, मानेचे व्यायाम शिकून घ्या. करू लागा. मान डोके कॉम्प्युटर पासून दूर ठेवा, वाकू नका असा सल्ला दिला. माझे चक्कर येण्याचे आणि मान दुखण्याचे प्रमाण हळूहळू त्या व्यायामामुळे खूपच कमी कमी होत गेले.

काही दिवसांनी कानात पाणी गेल्याचे निमित्त झाले आणि माझ्या कानातून खूप वेदना व्हायला लागल्या. योगायोगाने डॉक्टर प्रशांत यांचा छोटा भाऊ डॉक्टर प्रवीण सोनवतीकर हा "नाक, घसा, कान" यामधील पदवी प्राप्त करून पुढील

शिक्षण करिता "सरकारी नाक, कान, घसा रुग्णालय, मुंबई" येथे वसतिगृहात राहत होता. त्याला कळताच त्याने मला "वसतिगृहातच" या म्हणून बोलावून घेतले.

त्या दिवशी मी प्रथम मुंबईतील खाऊ गल्लीत चविष्ट पदार्थांची चव त्यांच्या सह घेतली. रात्री हॉस्टेल वर परतलो. त्यांनी माझी तपासणी भल्या मोठ्या यंत्रातून (microscope) केली. "अण्णा तुम्ही जेंव्हा प्रवास कराल तेंव्हा, थंडीत, सोसाट्याचा वारा असताना त्या कानात कापूस सतत ठेवा. वर्षभर पाण्याचा एकही थेंब कानात जाऊ देऊ नका. पोहू नका. डोक्यावरून आंघोळ करताना कानात पाणी जाऊ देऊ नका. आईस्क्रीम थंड पेय बंद. मी ते पथ्य तंतोतंत निष्ठेने पाळले. गेली २३ वर्षे आज पर्यंत माझे कानाचे दुखणे दूरवर पळाले. विजयाच्या बंधूचे शतशः आभार!!

हे पुस्तकच उत्तुंग व्यक्तिमत्वाच्या डॉ ऋषी देशपांडे यांच्यावर असल्याने वैद्यकीय क्षेत्रातील तीन डॉक्टर्स जे आम्हाला "फॅमिली डॉक्टर" या भूमिकेतून आम्हाला लाभले त्याविषयी मला इथेच सांगावेसे वाटते.

आम्ही १९७३ ते १९८९ पर्यंत अँटॉपहील वडाळा पूर्व येथे वास्तव्यास होतो. त्यावेळेस माझे वडील प्रिय दादा (आम्ही बाबाना दादा हाक मारीत असू) माटुंगा येथील पोस्ट कचेरीत होते. माटुंगा येथीलच डॉक्टर क्रिष्णन याना अनेक औषध कंपन्या "ओन्ली फॉर डॉक्टर्स " लिहून औषधे पाठवीत. आमचे दादा आपले कचेरीतील काम संपवून घरी जाताना अशा खूप महागड्या औषध बाटल्या, औषधी गोळ्यांचे महागडे खोके स्वतः जाऊन डॉक्टर क्रिष्णन यांना त्यांच्या दवाखान्यात नेऊन देत. दवाखाना बंद असला तर जवळच असलेल्या त्यांच्या घरी नेवून देत. कारण दवाखाना बंद असला तर पोस्टमन औषधे पोस्टातच परत घेऊन जात. औषधे काही दिवस पोस्टातच पडून राहत. हे लक्षात घेऊन दादा ती स्वतः नेऊन देऊ लागले. दादांची मदत लक्षात घेऊन डॉक्टर क्रिष्णन आमच्या कडून औषधाचे पैसेच घेत नसत. सहज मदत

करण्याचा किती छान अनुभव मी लहान वयात अनुभवला.

आम्ही "जे पी नगर" बोळींज विरार येथे राहायला असताना आमच्याच वसाहतीत होमीओपॅथ च्या डॉक्टर स्वाती तुळपुळे राहत. शंतनू ३ /४ वर्षाचा असताना त्याला एकाएकी खूप ताप चढे आणि घसा लाल होऊन खोकला सर्दी वारंवार होई. शंतनू ऑलोपॅथी ची कुठलीच औषधे घेत नसे. जबरदस्ती दिली तरी ओकून काढी. मग ताप वाढत जाऊन बेशुद्ध होण्याची टांगती तलवार आमच्या डोक्यावर राही. माझा आणि विजयाचा सर्दी खोकला ताप, पोटाच्या तक्रारीसाठी होमिओपॅथी गोळ्यांवर चांगलाच विश्वास होता म्हणून आम्हीच शंतनूला होमिओपॅथी गोळ्या द्यायला डॉक्टर स्वाती तुळपुळे याना स्वतःहून सांगितले. त्याचा चांगलाच परिणाम दिसू लागला. डॉक्टर स्वाती याना देखील शंतनू च्या तब्येतीबद्दल लवकरच पकड आली. एकदा रात्री ८ च्या सुमारास शंतनू चा ताप वाढला आणि नेहमीच्या गोळ्या देऊन देखील तो वाढतच गेला. रात्री १० वाजता ताप 3 अंशावर जाताच डॉक्टर स्वाती ना बोलावले. त्या दिवशी पहाटे ३ वाजेपर्यंत ताप ९८ अंशावर येईपर्यंत डॉक्टर स्वाती आमच्या बरोबरीने घरी बसून गप्पा मारीत थांबल्या. दुसऱ्या दिवशी शंतनू एकदम टुणटुणीत. तापमान गायब. अशाच डॉक्टर्स ना आपण "फॅमिली डॉक्टर" म्हणतो ना?

२००३ साली आम्ही बोळींज सोडले आणि गोरेगाव ला राहायला आलो. डॉक्टर स्वाती पुण्याला स्थायिक झाल्या. हे पुस्तक मी आणि विजया त्यांच्या घरी जाऊन भेट देणार आहोत.

गोरेगावला बस थांब्यावर विजयाची आणि डॉक्टर सोनल मास्टे यांची सहप्रवासी म्हणून भेट घडली. आम्ही अगदी शेजारच्याच इमारतीत राहत होतो. डॉक्टर सोनल या होमिओपॅथी पदवी धारक आणि एम एस सी डाएटिशन आहेत. वेळोवेळी मग आम्ही त्यांचीच औषधें घेऊ लागलो आणि त्यांना संपूर्ण कुटुंबाच्या प्रकृतीची इतकी उत्तम पारख झाली कि नंतर नुसत्या फोन वर लक्षणे सांगताच त्या सांगत "औषध मी तुमच्या इमारतीच्या गुरख्या

कडे दिले आहे ते घ्या. आज रात्री सांगा कसे आहे ते." इतकेच काय शंतनू अमेरिकेत जेंव्हा गेला होता त्यावेळेस त्यांचेकडून तातडीने लागणारी ताप, सर्दी, खोकला, पोटाचे विकार, डोके दुखी, हात पाय मुरगळणे, दात दुखी या सारख्या तक्रारी वरील औषधांचे मोठे पुडकेच त्याला उपयोगी पडले होते. आमच्या प्रत्येक कार्यक्रमात त्या भाग घेत असतात. ठाण्याला आम्ही राहायला आल्यावर देखील आम्ही फोन वर संपर्क ठेवून आहोत. औषधे अजून त्यांच्याच कडून घेतो. त्या नुसत्या फॅमिली डॉक्टर नाहीत तर त्यांच्या आणि आमच्या कुटुंबाचे घरगुती नाते जमले आहे. विजया आणि मी त्यांच्या घरी जाऊन हे पुस्तक आम्ही त्यांना देणार आहोत.

हे विचार मनात घोळत असताना मला कधी झोप लागली कळलेच नाही.

थेट मला दुसऱ्या दिवशी सकाळी ७ वाजता जाग आली तेंव्हा सिस्टर मला इंजेकशन देत होत्या. हळू हळू वेदना कमी होत राहिल्या. त्याच दिवशी मला धरून थोडेसे चालवत नेवून वजनाच्या काट्यावर उभे केले गेले. तेवढ्यात डॉक्टर ऋषी आणि त्यांची टीम आली. त्यांनी रिपोर्ट्स बघितले. मलाही काही प्रश्न विचारले. जाता जाता सांगून गेले "साठे, उद्यापासून चालायला सुरवात करायची....निदान १०० पावले तरी'. "त्या क्षणी तरी मला ते अशक्य वाटत राहिले. मनात म्हंटले बघूया उद्याचे उद्या.....

जीवनदान व त्याचा आनंद - रुग्णालयातील दैनंदिनी आणि चिंतन

दिनांक ३० जुलै २०२१ पासून सकाळीच मला लवकर जाग येऊ लागली. मुखमार्जन, रक्तदाब पाहणे, त्याच खोलीत टोकावर ठेवलेल्या वजन काट्यापर्यंत चालत जाऊन वजन करणे, सलाइन मधून औषधे आणि इंजेक्शन्स सुरु ठेवणे, चार पाच तासानंतर "मामा - वॉर्ड बॉय " यांच्या मदतीने १०० पावले चालण्याचा प्रयत्न करणे, मीठ नसलेले उपमा, खीर, आणि चहा, दूध मारी बिस्किट्स यांचा आनंद घेणे, वेळच्यावेळी दुपारचे, रात्रीचे जेवण आणि दूरदर्शन वर बातम्या, जे त्या दूरदर्शन सेट वर शक्य असतील ते बघत वेळ घालविणे असा भरगच्च कार्यक्रम होता. घरून कोणालाही त्या खोली यायला परवानगी नव्हती. काचेतून शंतनू, राजू मामा, नंदा मामी, संजू मामा जसा वेळ मिळेल आणि रुग्णालयात त्यांचा विजयासाठी म्हणून मुक्काम असेल तसे ते येऊन जात आणि डॉक्टर चमूला भेटून जात.

डॉक्टर ऋषी यांचे मदतनीस डॉक्टर्स दोन तीन तासांनी सतत फेऱ्या मारत आणि काही प्रश्न विचारून जात. तसेच देण्यात येणाऱ्या औषधांच्या यादीवर नजर टाकत. डॉक्टर ऋषी देशपांडे दररोज एकदा दुपारी १.३० च्या सुमारास आणि पुन्हा ३.३० ते ४.०० यावेळेत संपूर्ण मदतनीस चमूबरोबर - म्हणजे तीन-चार डॉक्टर चमूबरोबर तपासायला येत. भराभर प्रश्न विचारत असताना त्यांच्या मदतनीस डॉक्टर ना प्रश्न विचारीत, त्याच वेळी औषधांच्या यादीवर नजर मारून झटकन एखाद्या औषधासंबधी "हे आजपसुन बंद करा, ...अमुक अमुक सुरु करा तातडीने" असे सांगून नोंदवही वर काही शेरा मारून जितक्या वेगात येत तितक्या वेगात निघून जात. त्यांच्या त्या "शैलीकडे" बघताना मला फारच

कुतुहूल, उत्सुकता आश्चर्य, त्यांचे सूक्ष्म निरीक्षण, निर्णय घेण्याचा वेग आणि क्षमता या साऱ्याचे कौतुक वाटे आणि मनामध्ये एक जबरदस्त आत्मविश्वास तयार होई कि मी एका निष्णात, प्रामाणिक, सखोल वैद्यकीय, औषधाचे ज्ञान असणाऱ्या, प्रयोगशील, प्रयत्नशील, कुशल नेतृत्व करणाऱ्या एक फार श्रेष्ठ डॉक्टरांच्या हाताखाली उपचार घेत असल्याने माझी प्रकृती आल्या दिवसा गणिक भराभर सुधारणा होऊन त्यांनी म्हंटल्या प्रमाणे मी नक्कीच १५ - १६ दिवसात घरी जाऊन शकेन.

डॉक्टर ऋषी देशपांडे हे नेफ्रॉलॉजि मधील तज्ज्ञ, नामवंत आणि या विषयातील एक अधिकारी व खूपच व्यग्र असणारे व्यक्तिमत्व! परंतु साठे व कुलकर्णी कुटुंबासाठी ते नेहेमीच अगदी कुठल्याही वेळेत झटकन वैद्यकीय मार्गदर्शन करत असतात आणि म्हणून अत्यंत आदरपूर्वक आम्ही डॉक्टर ऋषींना आमच्या "कुटुंबाचे डॉक्टर" (फॅमिली डॉक्टर) मानतो.

दिनांक २७ जुलै पासून मला कशी औषधे देण्यात येत होती, कसे कसे बदल दररोज आवश्यकतेनुसार होत होते आणि दररोज किती रक्तातले घटक आणि इतर गोष्टी तपासल्या जाऊन त्यांचा सखोल तौलनिक अभ्यास करून प्रकृतीला आवश्यक ती औषधे, इंजेकशन्स, आणि जेवणातील पदार्थ कसे बदलत जात होते याचे खुमासदार वर्णन जितके करावे तितके थोडेच.

डॉक्टर ऋषी देशपांडे, त्यांचा चमू आणि युरॉलॉजिस्ट डॉक्टरांची टीम हे अगदी दररोज येऊन कशी चौकशी करीत, किती रक्त घटकांचा अभ्यास करीत आणि प्रकृती पाहून आणि काही प्रश्न विचारून त्याचा परत दिलेल्या औषध आणि इंजेकशन्स चा प्रभाव काय झाला याची प्रत्येक भेटीत चवकशी करीत. डॉक्टर ऋषी देशपांडे यांचा चमूतील डॉक्टर्स आणि युरॉलॉजिस्ट चमूतील डॉक्टर्स दोनदा फेरी मारून, तपासणी करीत आणि तपासणी करीत असताना त्यांचे स्वतःचे निरीक्षण सुरु असे आणि औषधांचा अभ्यास सुरु असे. डॉक्टर ऋषी दररोज एकदा दुपारी १.३० वाजता आणि पुन्हा ३.३० वाजता आपल्या

चमूतील डॉक्टरांसह बोलत बोलत येत. येताच "काय साठे, कसे आहात, काही तक्रार, पायावर सूज, चालणे सुरु आहे का, असे म्हणत असताना त्यांना वाटले तर शारीरिक तपासणी करीत अन्यथा त्यांच्या चमूने सांगितलेल्या काही निरीक्षणावर विचार करताना चार्ट वर फटाफट नजर मारून "हे औषध आता बंद करा, दुसऱ्याच औषधाचे नाव घेऊन ते लगेच मागवा आणि सुरु करा" असे सांगत जसे वेगात येत त्याच वेगात दुसऱ्या रुग्णाकडे निघून जात. त्यांच्या त्या कमी बोलण्याच्या पण आणि सूक्ष्म निरीक्षण करण्याच्या आणि अगदी सहज औषधात बदल वरचेवर करण्याच्या शैलीने आणि नेतृत्व करून अख्ख्या चमूचा आणि रुग्णाचा आत्मविश्वास वाढत असलाच पाहिजे याचा मला पुरेपूर प्रत्यय आला. माझा आत्मविश्वास दिवसागणिक वाढून त्याचे कायम होकारार्थी विचारामध्ये होत राहिले. त्यामुळेच तर सौ. विजया ला शस्त्रक्रियेच्या सहाव्या दिवशी आणि मला शस्त्रक्रियेच्या १६ व्या दिवशी घरी सोडण्यात आले.

दिनांक ११ ऑगस्ट २०२१ रोजी मला शंतनू, राजू मामा, संजू मामा हे सगळे घरी घेऊन जायला आले. घरी निघण्यापूर्वी मी एक छानशी कविता गेले दोन दिवस रचून माझ्या मोबाईल वर ठेवली होती ती डॉक्टर ऋषी देशपांडे आणि त्यांच्या चमूतील डॉक्टर्स ना व्हॉट्सअप वर पाठवून दिली. शंतनू ने तर ती कविता माझ्याकडून आदल्या दिवशी नेवून त्याला योग्य किडनीच्या चित्राची निवड करून त्यावर रंग संगती आणि सजावट करून आणली होती ती खाली उद्धृत केलेली "शुभेच्छांचे पान" कविता "केटीआर आयसोलेशन" च्या खोलीतील सिस्टर ना दिली. ती वाचताना त्यांच्या चेहेर्यावरील आनंद टिपत मी, शंतनू, राजू मामा आणि संजू मामा आम्ही रुग्णालयाबाहेर पडलो.

" शुभेच्छांचे पान "...

त्रिवार धन्यवाद माननीय डॉ. देशपांडे ऋषी !!!
आपण साठे-कुलकर्णी कुटुंबाला दिल्यात आनंदाच्या राशी !!!

विजयाच्या असीम त्यागाने मला मिळाले नवजीवन,
आपले अष्टपैलू मार्गदर्शन, निष्णात नियोजन,
आपल्या चमुतील डॉ शौर्य, डॉ आश्विन पाटील, डॉ रेजीता, यांची आस्थेने चौकशी सूक्ष्म निरीक्षण,
डॉ रावल, डॉ लाल मलानी, डॉ हर्षद, डॉ अजिंक्य, डॉ साची कुशल सर्जन,
डॉ ऋषी आपण मला २०११ मधील विचित्र आजारातून केले ठणठणीत, १० वर्षे राहिलो कार्यक्षम !!!
केटीआर मधील सिस्टर अन् मामा यांचे उत्तम सेवा भान,
जसलोक चे सुंदर व्यवस्थापन !!!

आपणा सर्वांची उतोरोत्तर प्रगती,
आणि मिळोत नामांकित पदके आणि मान सन्मान,
साऱ्यांच्या मदतीने आज मी जातोय घरी घेवून आनंद समाधान,
स्वीकारा आमच्या ह्या काव्य शुभेच्छांचे पान

आपले,

विजया, सुभाष , साठे-कुलकर्णी आणि डॉ. सोनवतीकर

घरी पोहोचलो आणि माझा आनंद द्विगुणित झाला. श्रीमयी, रमा, नंदा मामी, विजया सगळेच आतुरतेने वाट पाहत होते. खूप च आनंद आणि समाधान सर्वांच्या चेहेऱ्यावर दिसू लागले होते. सर्वाना अभिवादन करून आणि श्रीमयी ला गोङ पापी देऊन मी माझ्या साठी अगदी स्टार व्यवस्था केलेल्या खोलीत पोहोचलो. माझ्या आश्चर्याला आणि आनंदाला पारावार उरला नाही.

- खोली मध्ये मोठा पलंग
- जाड जाड खास करून घेतलेली गादी
- वातानुकूलित यंत्र
- जेवणासाठी दोन वेगळी छोटी मेज
- २४ तास अखंड इंटरनेट सेवा
- लॅपटॉप
- दूर दर्शन संच
- दोन आरामदायी खुर्च्या
- ३ लिटर पाणी भरून ठेवलेला जग
- औषधे ठेवण्यासाठी कपाटात स्वतंत्र कप्पा.....

काय नव्हते...शंतनू आणि रमा यांनी मी घरी येण्यापूर्वी इतकी सारी व्यवस्था केलेली पाहून माझ्या तोंडून सहजी उद्गार आले "ओह, एकदम पंच तारांकित व्यवस्था...यासाठी तुमचे कौतुक करावे तितके कमीच...शाब्बास..." दुसऱ्या दिवसापासून माझा घरचा दैनंदिन कार्यक्रम सुरु झाला.....

आम्हा दोघांच्या रुग्नालयातील वास्तव्यात राजू मामा, सौ.नंदा मामी यांनी हसत मुखाने आमच्या बरोबर आवश्यक तेव्हा रुग्णालयात वास्तव्यासाठी, लागणाऱ्या कोविड चाचण्या, केलेली धावपळ याला तोड नाही. शंतनू आणि राजू मामांचा मुलगा निलेश यांनी कार्यालयाचे काम सांभाळून वाहतूक व्यवस्था झकास ठेवली ते कौतुकास्पद आहे. आम्ही दोघे रुग्णालयात असताना सौ. वैशाली मामी यांनी त्यांच्या घराची, वयोवृद्ध सासू सासऱ्यांची

उत्तम काळजी घेतली. आमच्या घरी आमच्या स्नुषा सौ. रमा शंतनू साठे आणि शंतनू यांनी घर व्यवहार, कार्यलातील काम, संपर्क आमची साडे तीन वर्षाच्या नातीची - श्रीमयीची छान देखभाल केली, त्यासाठी त्या दोघांचे कौतुक करावे तितके कमीच ठरेल. मी आणि विजया घरी परतल्यानंतर तिची विशेष काळजी घेण्यासाठी म्हणून माझी वाहिनी ज्योती सुनील साठे मुलगा सर्वेश सह आमच्या घरी राहायला येऊन केलेली मदत आम्ही कधीच विसरू शकणार नाही. एकत्र कुटुंबाचा संस्कार चालू राहून एकमेकास कशी मदत होत असते याचे सौ. वैशाली मामी आणि ज्योती वाहिनी ही उत्तम उदाहरणे !!!

रुग्णालयातून घरी

मी घरी आलो त्या दिवसापासून जवळ जवळ आठ दिवस संपूर्ण विश्रांती घेतली. उठायची ताकदच नव्हती.

बोलायला लागलो कि खोकला सुरु व्हायचा. डॉक्टर ऋषी दर मंगळवारी आणि शुक्रवारी संध्याकाळी रक्त तपासणी चे रिपोर्ट्स घेऊन माझी तपासणी आणि काही प्रश्न, निरीक्षण, आणि तसे औषधात बदल करू लागले होते. एक आठवड्यात खोकला थांबला. अजूनही बोलताना आवाज खुप क्षीण होता. म्हणून मी कोणाचेही फोन घेत नव्हतो आणि केवळ सगळ्यांना व्हाट्सअप वर निरोप पाठवीत राहिलो. तोंडाला कुलूप बसल्याने माझे व्हाट्सअप वरील संदेश लांबलचक होत जायचे. मी तसे ज्याला संदेश पाठविला, त्याला त्याची कबुली देऊन मोकळा व्हायचो. आता थांबतो म्हणून संदेश पूर्ण करायचो. हो, कारण मला आता भरपूर वेळ होता, पण वाचणाऱ्याला कुठे एवढा वेळ - हे मला प्रकर्षाने जाणवायचे.

संकष्ट चतुर्थी च्या दिवशी मी माझ्या रुग्णालयात केलेल्या विचारांच्या मांडणीला - म्हणजेच आमच्या प्रत्यारोपण सुखद अनुभवाला, डॉक्टर ऋषी देशपांडे यांच्यामुळे आणि विजयाच्या खंबीर राहून असीम त्यागाला मनोमन आदर प्रकट करून "साद दैवाची - साथ विजयाची" असे पुस्तकाला शीर्षक योजून लेखनास सुरवात केली. माझा वेळ एकदम मजेत जाऊ लागला. निर्मितीचा शब्दात सांगता न येणारा आनंद मला अनुभवायला मिळू लागला आणि नकारात्मक कुठल्याच विचारांना आता मनात थारा उरला नाही.

विजयाने वेळेवर औषधे देण्याचा, संपलेली औषधे मागविण्याचा, रक्त तपासणी

साठी घरी माणूस पाठविण्या संदर्भात वेळोवेळी संपर्क ठेवण्याचा आणि दररोज वजन, रक्तदाब मोजून त्याची डॉक्टरांनी सांगितल्याबर हुकूम नोंद ठेवण्याचा कार्यक्रम निष्ठेने हाती घेतला.

रमा दिवसातून ४ वेळा अगदी आठवणीने "रक्तातील साखरेचे प्रमाण" मोजून ते नोंदवहीत नोंद करू लागली. एक दिवस तर तिने कमालच केली. मला दर ४ दिवसांनी "हिमोग्लोबिन" चे प्रमाण वाढण्याकरिता एक इंजेकशन घ्यावे लागणार होते. घरी येऊन कोणी ते इंजेकशन देईल असे वाटेना. रमा ने निर्णय घेतला आणि तिने ते इंजेकशन देणे सुरु केले. "गती मंद मुलांना शिकविण्याचे तिचे लौकिक शिक्षण झाले आहे. आणि त्याचाच भाग म्हणून अशा उपचार करणाऱ्या शिक्षकांना प्रथमोपचार शिक्षणामध्ये मध्ये "रक्तातील साखरेचे प्रमाण पाहणे, काही इंजेकशन्स देणे, गती मंद मुले जर आक्रस्ताळी झाली तर त्यांना रुग्णालयात नेईपर्यंत काही विशिष्ट औषधे देऊन शांत करणे" असा अभ्यासक्रम असतो. रमा ने इंजेकशन देण्याची जबाबदारी हाती घेतली. दर मंगळवारी आणि शुक्रवारी शंतनू कंपनीच्या कामाचे आयोजन करून मला, विजयाला डॉक्टर ऋषींच्या दवाखान्यात आरामदायी आमच्याच गाडीने नेऊ लागला. मध्ये वाटेत राजू मामा बांद्रा येथील त्याच्या कार्यालयात आमची वाट पाहत असायचाच. सुमारे चार महिन्यात एकदाही शंतनू, राजू मामा आणि निलेश यांच्या मूळे डॉक्टर ऋषी यांच्याकडे जाण्यात खंड पडला नाही.

हे सारे पाहता मी किती भाग्यवान आहे याचा आणि विजया, रमा, शंतनू, रघुराज मामा, निलेश, भरत राज मामा, ज्योती वाहिनी, नंदा मामी, वैशाली मामी, यांच्या सातत्याचे आणि दिलेल्या शब्दाचे तंतोतंत पालन करण्याच्या वृत्तीचे कौतुक वाटत राहते.

प्रत्यारोपण झाल्यानंतरच्या तीन महिन्यात मी कटाक्षाने खालील गोष्टींचे तंतोतंत पालन केले:

१. संसर्ग होऊ नये म्हणून जिवाणूरहित मास्क सातत्याने परिधान केला. मास्क दररोज बदलला.

२. सुरवातीचे दोन महिने तर मी माझ्या खोलीतून बाहेर देखील पडलो नाही. छोट्या नातीला देखील माझ्या खोलीमध्ये येऊ दिले नव्हते.

३. घरातील कोणालाही ज्या ज्या वेळेस सर्दी, खोकला झाला त्या त्या वेळेस त्यांनी कटाक्षाने मास्क परिधान केला आणि माझ्या जवळ ते आले नाहीत.

४. औषधे, जेवण, शारीरिक स्वच्छता यांच्या वेळा कटाक्षाने पाळल्या.

५. खाण्याच्या बाबतीत मला सांगण्यात आलेल्या सूचनांचे १००% पालन केले. (उदाहरणार्थ : फळे, पालेभाज्या, ब्रेड, बेकरी पदार्थ, शीत पेये, हॉटेल चे पदार्थ इत्यादींचे सेवन पूर्णपणे टाळले).

६. पाणी उकळून , थंड करून आणि गाळून आणि सांगितलेल्या प्रमाणात (मला दिवसाला तीन लिटर पाणी पिण्यास सांगितले होते) घेतले.

७. प्रत्येक आठवड्याला रक्त आणि लघवी तपासणी मेट्रोपॉलिस लॅब मध्ये केली आणि डॉक्टर ऋषी कडे तपासणी साठी जात राहिलो.

८. रुग्णालयातून दिलेल्या वही मध्ये दररोज रक्तदाब, लघवीचे प्रमाण, वजन यांची नोंद करून डॉक्टर ना दाखविली. त्यामुळे डॉक्टर ना वेळोवेळी औषध मध्ये बदल करणे सोयीचं झाले.

९. शरीरात झालेला सूक्ष्म बदल किंवा होणारा त्रास डॉक्टरांच्या निदर्शनास आणून दिला.

पुढील कालखंडात देखील मी आहार, विहार, प्रवास, जीवनशैली या मध्ये बदल करण्यापूर्वी डॉक्टरांना विचारूनच करणार आहे. त्याबरोबरच दिलेली औषधे

एकही दिवस / वेळ न विसरता, कंटाळा न करता मी घेतो आहे. तसेच डॉक्टरनी सांगितलेली पथ्ये, उदाहरणार्थ शस्त्रक्रियेनंतर चार महिने मी वजन उचलले नाही, हॉटेलमध्ये जाणे पूर्णपणे वर्ज्यच केले नव्हे हॉटेलचे किंवा चमचमीत पदार्थानाचे सेवन घरी आणून देखील केले नाही. पालेभाज्या, फळे, पाव, केक, बिस्किटे आणि बेकरी चे पदार्थ यांचे सेवन शस्त्रक्रियेनंतर तीन महिने पूर्णपणे टाळले कारण त्यापासून संसर्ग फार लवकर होतो.

एक पक्के आहे कि जरी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पूर्णपणे यशस्वी जरी झाली असली तरी आयुष्यभर औषधे घेणे, वेळोवेळी आवश्यक त्या वैद्यकीय चाचण्या करून घेणे आणि सतत डॉक्टरांच्या संपर्कांत राहून शरीरात झालेला सूक्ष्म बदल किंवा होणारा त्रास त्यांना सांगून त्यांनी सांगितलेली औषधे घेत राहणे आणि पथ्ये पाळणे यामुळेच मला सौ.विजया मुळे लाभलेली जीवनाची काही वर्षे सुखकर, आनंदी आणि कार्यक्षम राहणार आहेत.

केवळ किडनी घेणारा नव्हे तर किडनी दान करणाऱ्याने सुद्धा डॉक्टरांनी आणि रुग्णालयाने सांगितलेली सर्व पथ्ये अगदी प्रामाणिक पणे पाळणे अति आवश्यक आहे. उदाहरणार्थ शस्त्रक्रिया झाल्यानंतरच्या तीन चार महिन्याच्या कालखंडात वजन उचलावयाचे नाही, हॉटेल मधील पदार्थ घरी आणून देखील सेवन करावयाचे नाहीत, दिलेली औषधे वेळेवर घेणे, वैद्यकीय चाचणी सांगितल्यावर लगेच करून घेणे आणि डॉक्टर ना भेटून औषधात बदल असेल तर तो अमलात आणणे इत्यादी गोष्टीचे पालन करावयाचे. कारण या सगळ्या गोष्टींचे जितके काटेकोर पालन होते त्यावरच यशस्वी शस्त्रक्रियेनंतर चे आयुष्य सुखकर होणार असते अन्यथा संसर्ग होऊन पुन्हा अनेक जटिल प्रश्नांना आणि औषधोपचाराला सामोरे जावे लागते.

मी आणि माझे कुटुंबीय "डायलिसिस उपचार" करण्याऐवजी "किडनी प्रत्यारोपण" करून घेण्याच्या आम्हा सर्वानी घेतलेल्या निर्णयावर चांगलेच खुश आहोत. जर मला डायलिसिस उपचार सुरु करावे लागले असते तर गेल्या तीन

महिन्याचा माझा खर्च अंदाजे रु.७२,०००/- इतका तरी झाला असता (ज्यामध्ये डायलिसिस, औषधे, इंजेकशन्स, केंद्रावर जाण्या येण्याचा खर्च, कोरोना चाचणी, रक्ततपासणी इत्यादी खर्च अंतर्भूत धरून). डायलिसिस उपचारांची व्याप्ती ही वाढत जाणारी असते. सुरवातीस आठवड्यातून दोन वेळा लागणारे उपचार आठवड्यातून तीन वेळा करावे लागतात, आणि पुन्हा दर वेळेस कायम मनात संसर्ग होण्याची भीती राहते कारण डायलिसिस केंद्रावर जरी योग्य ती काळजी घेतली गेली तरी केंद्रावर एकपाठोपाठ एक रुग्ण त्याच यंत्रावर उपचार घेणार असतो आणि अन्य अनेक करणे अशी असू शकतात ज्यामुळे काही अंशी संसर्ग होणे ही शक्यता नाकारता येत नाही. संसर्गाच्या भीतीबरोबरच शारीरिक, मानसिक आणि भावनिक त्रास सहन करावा लागत असतो.

वरील प्रमाणे पैसे खर्च माझे झाले असतेच परंतु त्याबरोबर माझे आणि माझ्याबरोबर सोबत करणाऱ्या नातेवाईकाचे अंदाजे १२० तास (आठवड्याला २ डायलिसिस म्हंटले तर तीन महिन्याचे २४ डायलिसिस आणि प्रत्येक वेळी वाहतुकीला लागणारा वेळ धरला तर १२० तास). हाच वेळ मी आनंदात व्यतीत केला इतकेच काय पण त्या वेळेमध्ये माझ्या तीन पुस्तकांची मी निर्मिती करू शकलो आणि आतापर्यंत केवळ मनात बाळगलेल्या इच्छेला मूर्त स्वरूप देऊ शकलो आणि एक वेगळ्याच प्रकारचे समाधान मिळवू शकलो आणि जीवनाच्या कुठच्याही परिस्थितीत सकारात्मक कसे जगावे याचा मस्तच अनुभव मला मिळाला.

म्हणूनच मला आणि माझ्या कुटुंबियांना "प्रत्यारोपणाचा" आमचा निर्णय खूपच योग्य आणि वेळेवर घेतला गेला याचे राहून राहून समाधान वाटते. अर्थात, हे सारे शक्य झाले ते केवळ विजयाच्या दुर्दम्य इच्छाशक्तीने, खंबीरपणे आणि फिकीर किंवा किंतु मनात न ठेवता केलेल्या किडनी दानामुळे आणि माझे सर्व कुटुंबीय, नातेवाईक आणि मित्र मंडळींच्या निस्वार्थ मदतीमुळेच!!

मला इथे हे देखील नमूद करावेसे वाटते की माझे प्रत्यारोपण हे “pre-emptive transplantation” म्हणजे अशा विविक्षित वेळी जेंव्हा डायलिसिस उपचार सुरु झाले नव्हते परंतु थोड्याच अवधीत तसे उपचार सुरु करावे लागलेच असते.

त्याचबरोबर मला हे सुद्धा इथे सांगावेसे वाटते की, "किडनी प्रत्यारोपण" हे सर्वच किडनी रुग्णांना करावयास डॉक्टर परवानगी देऊ शकत नाही. ज्या रुग्णांना अशा काही व्याधी अगोदरच आहेत ज्यांच्यावर उपचार सुरु असून देखील त्या कधीच बऱ्या होणाऱ्या नसतात आणि ज्या रुग्णांना कॅन्सर, मेंदू विकार, हृदयरोग अशा सारखे अतिशय गंभीर आजार असतात आणि काही मानसिक, क्लिष्ट मधुमेह व्याधी आहेत ज्या बऱ्या होऊ शकणार नाहीत अशा वेळी डॉक्टर "किडनी प्रत्यारोपण" करावयास परवानगीच देत नाहीत.

सर्वसाधारपणे "किडनी प्रत्यारोपण" शस्त्रक्रियेसाठी अंदाजे रु.७/- लाख तो रु.११/- लाख इतका खर्च येतो. अर्थात हा खर्च अनेक बाबींवर अवलंबून आहे. उदाहरणार्थ रुग्णालयाचा प्रकार आणि रुग्णालयाचे ठिकाण, पेशंट ची अवस्था, शस्त्रक्रिये दरम्यान आणि शस्त्रक्रियेनंतर कराव्या लागणाऱ्या वैद्यकीय चाचण्या आणि तातडीने उपचार आणि त्यामुळे रुग्णलयातील वाढीव वास्तव्य, शस्त्रक्रिये दरम्यान उद्भवणाऱ्या आणि अपेक्षित नसलेल्या काही गंभीर समस्या आणि त्यावरील उपचार या सर्वामुळे हा खर्च वाढत जातो.

आता माझ्या बाबतीत बघू जाता मला हा रोग वंशपरंपरेने माझ्या वाट्यास आला होता. ज्याला इंग्रजीत “Hereditary (Autosomal Dominant) Polycystic Kidney Disease” असे म्हंटले जाते. ज्याचा उल्लेख याच पुस्तकाच्या सुरवातीसच मी केला आहे. हा आजार मला आहे आणि त्यावर इतर काही उपचार नाही ह्याची मला कल्पना असल्यामुळे जी काही पथ्ये किंवा गोष्टीचे आयुष्यात पालन करावे लागणार होते ते ते मी कटाक्षाने केले जेणे करून मी फेब्रुवारी २०२१ पर्यंत आजाराला थोपवून धरू शकलो आणि

कार्यक्षम राहू शकलो. परंतु जस जसे वय वाढत जाते म्हणजे एखाद्या व्यक्तीसाठी ६० - ६५ इतके झाले कि किडनी चे कार्य मंदावत जाते आणि आजाराची व्याप्ती शरीरभर पसरू लागते, लक्षणे ठळक पणे जाणवू लागतात.

म्हणूच मला जाता जाता असे सांगावेसे वाटते कि ज्यांना अशा काही समस्या किंवा आजार नाही अशा व्यक्तींनी आपली किडनी कार्यक्षम राहण्यासाठी खालील काळजी घेणे आवश्यक आहे. जेणे करून किडनी सारख्या गंभीर आजारापासून स्वतःला शक्यतो दूर ठेवणे शक्य होईल तेवढा प्रामाणिक प्रयत्न केला पाहिजे.

- सुयोग्य, सुरक्षित अन्न पदार्थांचे सेवन (हॉटेल किंवा उघड्यावरील पदार्थ टाळणे)
- स्वतःच्या प्रकृतीसाठी झेपेल असा नियमित व्यायाम
- स्वतःचे वजन आटोक्यात ठेवणे
- गाढ ८ तासांची झोप आणि आवश्यक तेंव्हा पुरेशी विश्रांती
- धूम्र पान टाळणे
- मादक पदार्थाने सेवन टाळणे
- दैनंदिन कामामुळे येणाऱ्या ताणाचे व्यवस्थापन
- मधुमेह आणि रक्तदाब आणि हृदयरोग लक्षणे यावर बारकाईने लक्ष ठेवून त्यावरील औषध योजना डॉक्टरी सल्ल्यानुसार सुरु ठेवणे
- साधारण पणे ४० / ४५ वयानंतर अतिशय सुसूत्र पणे आणि वक्तशीर पणे वैद्यकीय तपासणी करून घेणे

याशिवाय, पुरेसे आणि योग्य असे "विमा कवच" शक्यतो तरुणपणीच काढून ठेवणे अतिशय आवश्यक आहे. कारण एखादा गंभीर आजार, अपघात आपल्या वाट्यास दुर्दैवाने आलाच तर निदान पैशा अभावी आणि कुटुंबाची आर्थिक स्थिती बिघडू न देता उपचारासाठी आपण सज्ज असेलच पाहिजे.

आता एवढी काळजी घेऊन देखील दुर्दैवाने आपणाला किडनी चा आजार झालाच तर तो लक्षात कसा आणावा किंवा कुठली लक्षणे सांगून जातात कि किडनी चा आजार किंवा किडनीचे कार्य हळू हळू मंदावले आहे आणि मग लवकरात लवकर इतर काही अंदाज बांधत न राहता किंवा स्वतःच उगाच कुठली तरी औषधे घेत न राहता नेफ्रालॉजिस्ट ला प्रकृती दाखविणे हितावह असते. अशी काही लक्षणे पुढील प्रमाणे दिली आहेत.

- त्वचा कोरडी राहणे किंवा त्वचेला खाज येणे
- शक्ती कमी होणे, सारखा थकवा येणे, एकाग्रता होण्यात अडचणी, दैनंदिन कामामध्ये मनाचा उगाच गोंधळ उडणे
- मूत्रावाटे रक्त जाणे
- वारंवार लघुशंकेस जावे लागणे किंवा कमी कमी लघवी होणे
- स्नायूमध्ये वावडे येणे
- पायावर, घोट्यावर सूज येणे
- शांत गाढ झोप न लागणे किंवा रात्रीची झोप न येणे
- भूक कमी होणे

आता आपण पुन्हा आपल्या या पुस्तका संदर्भात विवेचन करूया.

यथावकाश माझी सक्तीची विश्रांती पूर्ण झाली आणि त्याचबरोबर "पुस्तक लेखन" पूर्णत्वास गेले. ज्योती वहिनीची प्रत्येक टप्प्यावर मदत होत राहिली. त्यामुळे या पुस्तकाला एक वेगळेच परिमाण लाभले.

पुनः एकवार "हे पुस्तक" लिहिण्यामागील उद्देश स्पष्ट करून मी वाचकांच्या हाती देतो.

- मला आलेला सुखद अनुभव वाचून रुग्ण आणि त्याच्या नातेवाइकांना दिलासा मिळावा आणि त्यांचा ताण कमी व्हावा.

- जिथे मूत्रपिंड व लिव्हर दात्यांची घरातील किंवा ओळखीच्या व्यक्ती “दाता" म्हणून वैद्यकीय दृष्टीने योग्य ठरत नसेल तर अशा वेळी आपले नाव कुठे नोंदवायचे, कोण अशी नावे नोंदवतात, वगैरे जुजबी माहिती देण्याचा देखील मी प्रयत्न रुग्णाच्या मनःस्थितीचा विचार करून केला आहे. त्यात वेळोवेळी बदल होईल ती काळजी मात्र वाचकांनी घ्यायची आहे.
- जी रुग्णालये "मूत्रपिंड प्रत्यारोपण" आणि "लिव्हर ट्रान्सप्लांट" करतात अशा रुग्णालयाची नावे देखील मी पब्लिक डोमेन मधून घेऊन ह्या पुस्तकात केवळ "माहिती साठी' टाकली आहेत.

ज्या रुग्णांना कुटुंबातील / ओळखीच्या व्यक्तीकडून अवयव दाता मिळू शकत नाही अशा रुग्णांसाठी थोडीशी माहिती - आवश्यक ती लिंक

Indian transplant registry

An 'Indian transplant registry' has been established over the past two years due to the efforts of the Indian Society for Organ Transplantation.

The registry is currently in the first phase of its development and can be partly viewed at www. transplantindia. com

Currently the data from various hospitals is being sent by email to the web master and the data is entered into the program.

Registration process: Hospitals doing transplants in India can register on the website with their essential information and request for login name and password. An email will then be sent to the secretary of the society and the password can be issued within 24 to 48 hrs.

Hospitals that have submitted kidney and liver data to the registry:

Hospital name	**City, State**
Sanjay Gandhi Post Graduate Institute of Medical Sciences	Lucknow, UP
Apollo Hospitals	Chennai, Tamil Nadu
Devaki Hospital Ltd.	Chennai, Tamil Nadu
Vijaya Health Centre, Vadapalani	Chennai, Tamil Nadu
Sri Ramachandra Medical College and Research Institute	Chennai, Tamil Nadu
CMC Hospital	Vellore, Tamil Nadu
Jaslok Hospital and Research Centre	Mumbai, Maharashtra
Manipal Hospital	Bangalore, Karnataka
Karnataka Nephrology and Transplant Institute	Bangalore, Karnataka
Muljibhai Patel Urological Hospital	Nadiad, Gujarat
Sri Ganga Ram Hospital	New Delhi
Global Hospital	Hyderabad, Telangana
Mahavir Hospital	Hyderabad, Telangana

The following is the list of NGOs and various foundations who provide financial help to patients subject to satisfying eligibility criteria. (picked up from public domain – google site)

Indian Renal Foundation
https://www.indiarenalfoundation.org
India Renal Foundation has been providing financial assistance to needy patients under 'Save a Life' programme for haemodialysis treatment and post transplantation.

In addition, the following links and sites will give more details about "The financial help provided for Kidney / liver Transplantation to patients subject to meeting the eligibility criteria mentioned in their respective guidelines / sites.

Rashtriya Arogya Nidhi - Ministry of Health and Family Welfare
https://main. mohfw. gov. in › RAN_Guideline_2019

Financial assistance –
American Kidney Fund
https://www. kidneyfund. org › financial-assistance

Transplant Organizations
National Kidney Foundation
https://www.kidney.org/patients/resources_Transplant

NGOs List in India
MOHAN Foundation
https://www. mohanfoundation. org › ngos-list

List of Trust for Medical Help - Charity Commissioner . . .
https://charity.maharashtra.gov.in/Portals/files

रुग्णांसाठी आर्थिक मदत देणाऱ्या संस्थांची माहिती

खालील संस्था काही गरजू रुग्णांची / त्याच्या कुटुंबाची आर्थिक क्षमता (मासिक / वार्षिक) लक्षात घेऊन आणि स्वतःचे काही निकष ठरवून, गरजू रुग्णांना "मूत्र पिंड प्रत्यारोपण, डायलिसिस, लिव्हर प्रत्यारोपण अशा काही आजारासाठी आर्थिक मदत देत असतात. त्या त्या संस्थांची कार्यपद्धती, आर्थिक मदत मंजूर होण्यासाठी आवश्यक असणारे "निकष" आणि संपर्क क्रमांक व ई-मेल यामध्ये वेळोवेळी बदल होत असतो हे वाचकांनी / रुग्णांनी लक्षात ठेवले पाहिजे. .

Sir Ratan Tata Trust Bombay House,
Homi Mody Street, Mumbai 400 001
022-66658282

Reliance Foundation
(Previously Ambani Public Charitable Trust)
222 Maker Chambers IV, 3rd Floor, Nariman Point, Mumbai - 400021
022-44770000, 022-30325000

Amirilal Ghelabhai Charitable Trust
71, Gitanjali, 73 / 75, Walkeshwar Road, Mumbai - 400006

Asha Kiran Charitable Trust
C/o Radium Keysoft Solutions Ltd,
Raigad Darshan, Opposite Indian oil Colony, J. P. Road, Andheri (w) Mumbai 400 053
022-26358290 101,

Aspee Charitable Trust,
C/o Americal Spring and Pressing Works Pvt. Ltd, P. O. Box No. 7602, Adarsha Housing Soc. Road, Malad (w), Mumbai 400 064

Aured Charitable Trust
1-B-1 Giriraj, Altamount Road, Mumbai 400 026,
022-23821452, 022-24926721

B. Arunkumar & Co.
1616, Prasad Chambers, Opera House, Mumbai - 400004

B D Bangur Trust
C/o Carbon Everflow Ltd.
Bakhawar, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400021

Bombay Community Public Trust (BCPT)
5th Floor Regent Chambers, Nariman Point, Mumbai 400021
022-22845928 / 022-22836672

Burhani Foundation
276 Dr. D. N. Road Lawrence & Mayo House Fort, Mumbai-400001

Century Seva Trust
Century Bazar, Worli, Mumbai - 400025

Centre for Research & Development
Shreyas Chambers, Ground Floor, 175-Dr. D. N. Road, Fort, Mumbai - 400 001

Chief Minister's Relief Fund,
Government of Maharashtra
Mantralaya, 6th Floor Nariman Point, Mumbai - 400020

Damodar Anandji Charity Trust
66, Vaju Kotak Marg, Near G. P. O, Mumbai -400001

Diamond Jubliee Trust
Aga hall, Nesbit Road, Opp. St. Mary's High School, Mumbai 400010,
022-23775294, 022-23778923

Dharma Vijay Trust
C/O Kilachand Devchand & Co.
New Great Insurance Bldg. , 7, Jamshedji Tata Road, Mumbai - 400020

Dharamdas Trikamdas Kapoorwala
46, Ridge Road, Rekha No. 2, 4th Floor,
Mumbai - 400006

Dhirubhai Ambani Foundation
Reliance Industries Limited, Reliance Centre, 19, Walchand Hirachand Marg, Ballard Estate, Mumbai 400 038.
Tel : 022-30327000

Dhirajlal Talkchand Charitable Trust
Shailesh Niwas, Subhash Lane, Daftary Road, Malad (E), Mumbai - 400097

Dhirajlal Morarji Ajmera Charity Trust
37 - A, Sarang Street, Mumbai - 400003

Dipchand Gardi Charitable Trust
Usha Kiran, 2nd Floor, Altamount Road, Mumbai - 400006

Divaliben Mohanlal Charitable Trust
Khatau Mansion, 1st Floor, 95-K. Omer Park, Bhulabhai Desai Road, Mumbai 400 026

Ekta Charitable Trust
4/444, Panch Ratna, Opera House, Mumbai -400004

Eskay Charitable Trust
C/O Caprihans India Ltd. , Shivsagar Estate, 'D' Block, 2nd Floor, Dr. A. B. Road, Worli, Mumbai - 400018

Excel Process Pvt. Ltd. Charitable Trust
117 / 118, Mathurdas Vasanji Road, Chakala, Andheri (E), Mumbai – 400093

Fazalbhoy Charitable Trust
Near Liberty Cinema, Marine Lines,
Mumbai -400020

Gala Foundation
Behind Vakola Municipal Market, Nehru Road, Vakola, Santacruz(E) Mumbai

Garware Foundation Trust
Chowpatty Chambers, Mumbai - 400007

Gokak Foundation
Forbes Bldg. , Forbes Street, Mumbai - 400023

Goodlass Nerolac Paints Ltd. (Trust)
Nerolac House, A. G. Kadam Marg, Lower Parel, Mumbai

Govind Dattatraya Gokhale Charitable Trust
Kalpataru Heritage, 5th Floor, 129, M. G. Road, Mumbai 400 023, 022-22673831

Harendra Dave Memorial Trust
C/O Janmabhoomi, 3rd Floor, Janmbhoomi Marg, Mumbai 400001

Helping Hand Charitable Trust
3, Vidarbha Samrat Co-op Hsg. Society, 93-c, V. P. Road, Vile Parle (West), Mumbai - 400 056, Tel: 022-6147448

Hiranandani Foundation Charitable Trust
Olympia, Central Avenue, Hiranandani Business Park Powai, Mumbai 400076

Herdillia Charitable Foundation
Air India Building, 13th Floor, Nariman Point Mumbai 400 031, 022-22024224

Hirachand Govardhandas
222, Maker Chambers 1V 3rd Floor, Nariman Point Mumbai 400021

H. M. Mehta Charity Trust
Mehta House, 4th Floor, Apollo Street, Khushru Dubhash Marg, Mumbai - 400001

H. S. C. Trust
Ready Money Mansion, Veer Nariman Road, Mumbai - 400023

Jamnalal Bajaj Foundation
Bajaj Bhavan 2nd Floor, Jamnalal Bajaj Marg, 226 Nariman Point,
Mumbai 400 021,
T: 022-22023626

Shree Siddhivinayak Temple Trust Prabhadevi,
Mumbai - 400 028, Tel. 022-24373626 :

DIALYSIS facility at cheaper rate available at:

Siddhivinayak Temple, Dadar, Mumbai – 400028

The Existing rate per Dialysis is Rs. 200/- only.

Larsen and Toubro Health & Dialysis Centre,

1st floor, Teejadeep Mall, Meenataai Thackeray Chowk, Uthalsar, Thane West, Maharashtra – 400 604

Contact no 022- 21720063/21720064.

Timings: Monday to Saturday: 09. 00 am to 05. 00 pm

Sunday closed.

Existing Rate per Dialysis is Rs. 500/-

(This Centre is open for general public)

Nana Palkar Smruti Samiti

Maharshi Dadhichi Hospital, Near Santacruz Bus Depot & Railway Station, Satacruz (E), Mumbai –
400 055

Tel No – 022 26123006/26124259

Email Id – nanapalkar. mddc@gmail. com

Nana Palkar Smruti Samiti

Eksar Maternity Home & Dispensary.

D D Borge Marg, Eksar Road, Borivali, Mumbai 400 092

Phone No. 022-28901096 / 9321795805

Nana Palkar Smruti Samiti
Gokhale Dialysis Centre,
Rugn Seva Sadan, 158, Rugn Seva Sadan Marg,
Parel, Mumbai 400 012
Phone No. 022-24164890/24102167

Patients coming from outside Mumbai for treatment of Heart, Kidney, Liver, Cancer are offered lodging facility (subject to availability and meeting the criteria) at:

Nana Palkar Smruti Samiti
Rugn Seva Sadan, 158, Rugn Seva Sadan Marg, Parel, Mumbai 400 012
Phone No. 022-/24102167 / 24186724 / 24164890

At the following address, medicines at reasonably lower rates are available:

Hope Specialty Pharma
Old Building 2A / 2, S. S. Wagh Marg, Gandhi Chowk, Naigaon, Dadar (East), Mumbai - 400014.
Tel: 9224247365 / 9022247365 / 022- 24147365
hspmumbai@gmail. Com

आपणा सर्वांचे पुन्हा एकवार मनापासून आभार व्यक्त करून पुस्तकाला पूर्ण विराम देतो.
आपला,

सुभाष यशवंत साठे
subhash_ysathe@yahoo.com
M: 9870263676

सौ. विजया साठे
vijaya.sathe.s@gmail.com
M: 9773177315

आपल्या बहुमूल्य प्रतिक्रियांमुळे लेखकाला शाबासकीची थाप मिळत असते. त्याबरोबरच वाचकांच्या बारकाईने केलेल्या निरीक्षणामुळे केलेल्या मौलिक सूचनांचा लेखकाच्या पुढील निर्मितीत त्याचा उपयोग खूप खूप होत असतो.

परिशिष्ट - संदर्भासाठी आभार

माझ्या शस्त्रक्रियेसाठी आणि हे पुस्तक लिहिण्यासाठी मला खूप जणांची, संस्थांची, गुगल साईट ची आणि सार्वजनिक डोमेन ची मदत झाली त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार. मी खाली त्या सर्वांची नावे लिहिण्याचा प्रयत्न केला आहे परंतु नजर चुकीने एखादे नाव राहून गेले असेल तर मला त्याबद्दल मोठ्या मनाने क्षमा करावी अशी विनंती.

1. Dr.Rushi Deshpande and his Nephro Team
2. Dr.Raval, Dr.Lalmalani and their URO Team
3. Mr.Nilesh Sorote, Transplant Coordinator, Jaslok
4. Concerned Committee of Doctors approving my Kidney Transplant.
5. Indian transplant registry www.transplantindia.com
6. Indian Renal Foundation https://www.indiarenalfoundation.org
7. Google Site
8. ICU / KTR Isolation Centre, Jaslok Hospital.
9. Management of Jaslok Hospital & Research Centre, Mumbai
10. Advocate Pravin K Gupta
11. Smt. Jyoti Sunil Sathe
12. Mr. Vishwas Sohoni
13. Mr.Suresh Hande

14. Dr.Prashant Sonwatikar
15. Dr.Pravin Sonwatikar
16. Dr. K. J. Kamat
17. Mrs. Shweta Tilak
18. Larsen and Toubro Health & Dialysis Centre, Thane.
19. Nana Palkar Smruti Samiti, Parel, Mumbai
20. National Kidney Foundation
21. Dr.Usha Talvadkar

संक्षिप्त परिचय

सौ. विजया सुभाष साठे, प्रकाशिका (किडनी देणारी)

- खंबीर राहून "किडनी देण्याचा" निर्णय अमलात आणला
- या पुस्तकाची प्रकाशिका
- "कार्यालय अधीक्षक" म्हणून "कामगार राज्य विमा महामंडळातून सेवा निवृत्त
- सामाजिक कामाची आणि शक्य तिथे सर्वाना मदत करण्याची आवड

सुभाष यशवंत साठे, लेखक (किडनी स्वीकारणारा)

- वकील - उच्च नायालय, मुंबई
- "असिस्टंट जनरल मॅनेजर – पेर्सोनेल ऍडमिनिस्ट्रेशन", लार्सन अँड टुब्रो मधून सेवा निवृत्त
- हिंदुस्थान युनिलिव्हर, अंधेरी येथे "सल्लागार" म्हणून काम
- वर्तमानपत्रातून, दिवाळी अंकातून, एल अँड टी च्या मासिकातून अनेक लेख कविता प्रसिद्ध

डॉ. ऋषी देशपांडे,
MD, DM, DNB (Nephro)

- Fellow in Nephrology, University of Toranto
- Fellow in Kidney Transplantation
  (American Transplant Society)
- Consulting Nephrologist &
  Renal Transplant Physician,
- Hon. Nephrologist
  H.E. The Governor of Maharashtra
- Director Nephrology (Academic) – Jaslok Hospital
- Hon. Consultant:
    - Saifee Hospital
    - Reliance Foundation Hospital